
# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, ४ एप्रिल २०२३


अहिंसा परमो धर्म ।
अहिंसा परमो जननं ।।
अहिंसा परमो तपः ।
अहिंसया किं न साध्यते ।।

## भगवान महावीर जन्मकल्याणकच्या मंगलमय शुभेच्छा !







सुमित जैन : 7620111118 राजेश जैन : 7588348738 रमेश जैन : 9860481142, 7620111117

### सौजन्य

- महावीर घर संसार प्रा. लि., चिकलठाणा
- महावीर घर संसार, चेलीपुरा
- महावीर मेटल डेपो, करोडी
- महावीर मेटल मॅन्युफॅक्चरर, खोजेवाडी
- महावीर पत्रा डेपो, शेंद्रा
- महावीर बेस्ट प्राईस, चिकलठाणा
- महावीर स्टील ट्रेडर्स, खोजेवाडी

छत्रपती संभाजीनगर

www.mahavirbestprice.com, sumitparakh73@gmail.com




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## साहित्य अभिवाचनाची पंढरी : चाळीसगाव नगरी


आधुनिक केसरी

फेब्रुवारी २०२३ मध्ये पहिल्या आठवड्यात महाराष्ट्रातील वर्धा येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पार पडले. या सांस्कृतिक महोत्सवाला जसे देशभरातून साहित्यिक आणि साहित्य रसिक हजेरी लावतात, मायमराठीचा जागर होतो, विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम होतात, वाङ्मयीन चर्चा होतात आणि तीन दिवसांच्या भरगच्च कार्यक्रमांची सांगता होऊन उपस्थित असणारे सगळेच काहीतरी मौल्यवान असे देऊन जातात आणि घेऊनही जातात ; अगदो तसाच अभिवाचनाचा महोत्सव दरवर्षी चाळीसगावला भरतो आणि साहित्य अभिवाचनाच्या वारकऱ्यांची पाऊले चाळीसगाव नगरीच्या दिशेने वळतात. यावर्षी हा सांस्कृतिक महोत्सव २४, २५ आणि २६ फेब्रुवारीला चाळीसगावमध्ये नुकताच संपन्न झाला. जी संस्था दरवर्षी ही सांस्कृतिक यात्रा भरवते, त्या संस्थेचं नाव आहे रंगगंध कलासक्त न्यास. संस्थेचं नाव जेवढं सुंदर आणि अर्थपूर्ण आहे, तेवढंच संस्थेचं कार्यही. चाळीसगावमधील ज्येष्ठ स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ मुकुंद करंबेळकर हे या संस्थेचे प्रमुख आणि सर्वेसर्वा. हसतमुख, प्रसन्न आणि मृदू व्यक्तिमत्वाचे धनी




असलेल्या डॉ मुकुंद करंबेळकर यांना तेवढीच समर्थ साथ डॉ मीनाक्षी वहिनींची लाभली आहे. डॉ मुकुंद करंबेळकर हा मुळातच प्रचंड कलेचं आणि नाटकांचं वेड असलेला माणूस ! व्यवसायानं डॉक्टर, शल्यकर्म करून नवनिर्मितीचा वसा घेतलेले हे सर्जनशील हात, कलेच्या क्षेत्रात देखील काहीतरी नवीन करावे यासाठी आसुसलेले होते. 'शल्यशोभा' हे त्यांच्या हॉस्पिटलचं अनेक अर्थांनी अर्थपूर्ण असणारं नाव ! या माणसाच्या मनात

चाळीसगावात एखादी नाट्यसंस्था नाही, नाट्यगृह नाही हे शल्य बोचत होतं. आपला व्यवसाय करता करता सतत डोक्यात असलेला नाटकाचा किडा या माणसाला स्वस्थ बसू देत नव्हता. त्यातून त्यांनी मग १९९४ मध्ये एकांकिका बसवायला सुरुवात केली. स्थानिक कलाकारांना हाताशी धरले. चार पाच वर्षे आपल्या लिखित, दिग्दर्शित एकांकिका घेऊन महाराष्ट्रभर फिरले. कुठे बक्षीस मिळालं, कुठे नाही. पण प्रयत्नात मात्र कसूर केली नाही. स्वतः डॉक्टरांनी काही एकांकिका लिहिल्या, दिग्दर्शित केल्या. चाळीसगावातील विद्यार्थ्यांना काहीतरी सकस आणि चांगले वाचायला मिळावे आणि वाचनाची आवड त्यांच्यात जोपासली जावी या हेतूने डॉक्टरांनी अनेक वर्षे ज्ञानप्रबोधिनीच्या 'छात्र प्रबोधन' या मासिकाचा प्रचार आणि प्रसार केला.



## आनंदी पहाट

### विचारांमध्ये नकारात्मकता नसावी

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या आयुष्यात अथवा इतरत्र काय घडले आहे, हे आपल्याला माहिती असतेच किंवा ते कालांतराने माहिती होतेच. कालची, भूतकाळातील माहिती आपल्या सर्वांनाच उपलब्ध होत असते. वर्तमानात राहून भूतकाळातल्या अनुभवांबरोबर सतत राहणे हे नेहमीच उपयोगाचे ठरते असे नाही. प्राप्त परिस्थितीत काहीवेळा उपलब्ध झालेल्या अनेक चांगल्या संधी आपण गमावू शकतो. ह्याचे नुसते ज्ञान असून चालत नाही तर त्या संधीचे सोने करण्याचे भान आपल्याला असणे आवश्यक असते. अनेकदा आपल्या गत युष्यातील अनेक बाबींची सांगड, बरोबरी, तुलना आपण प्राप्त आणि सद्यःस्थितीशी करत असतो. काहीवेळा नकारात्मक विचार आपल्या अंतर्मनांत थैमान घालायला लागतात आणि भ्रमातले आपण संभ्रमांत जखडून राहतो. अनेकदा नकारात्मक विचारच आपले नुकसान करतात. येणाऱ्या अनेक विचारांमध्ये नकारात्मक विचार आपल्याकडून अनावधानाने आपलेसे केले जातात. ह्या नकारात्मक विचारांचा पगडा आपल्या अंतर्मनावर अधिक बसला तर त्याचे परिणाम विपरीत होत असल्याचे अनुभवायला येऊ लागते. आठवणी म्हणजे आनंदाचे कंद हे एकीकडे आपण अनुभवत असतो, पण त्या आठवणींत आपण स्वतः किती व्यस्त व्हायचे, ह्याचे भान राखणे देखील महत्वाचे ठरते. जोपर्यंत काही घडत आहे, तो पर्यंत सर्व ठीक आहे; पण जेव्हा काही बिघडेल तेव्हा मात्र निस्तरणे मुश्कील ठरू शकते. ह्याची जाणीव आपल्याला होणे अधिक महत्वाचे आहे. कित्येकदा, ह्या आठवणीच आपल्या मनाला उभारी देत असतात. आपला मानसिक एकलेपणा दूर करण्याच्या कामी येतात. आपण शरीराने एका वेळेला एकाच ठिकाणी जाऊ शकतो, पण गत काळातल्या आठवणी मात्र आपल्याला अनेक ठिकाणांची सफर करवून आणतात.



आधुनिक केसरी

**आयुष्याचे सोने | अभंगात ||**

ताल सूर लय | गीताचा हा आत्मा ||
सांगे परमात्मा | गीताराग ||१||
घडावा संवाद | मनाचा आत्म्याशी ||
गुज इतरांशी | करू नये ||२||
अनाहत नाद | गुंजता अंतरी ||
डोले चराचरी | आत्माराम ||३||
श्वासाचे चालणे | नादब्रह्म होता ||
ज्ञानेश्वरी-गाथा | वर्म झाली ||
समेवर यावे | जगण्याचे गाणे ||
आयुष्याचे सोने | अभंगात ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

नापराधस्तथापीह
दण्ड्यते सज्जनः कथम् |
विस्मृतिः पादयोस्ते या
तदेकं क्लेशकारणम् || 3 ||
अपराध नसतानाही सज्जनाला दंड कसा केला जातो ? तुझ्या चरणांची जी विस्मृती, तेच एक क्लेशाचे कारण आहे.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**चंचलता दिन दिन बढ़े, कुटिल कुचाल कुभाव । छुद्र छिद्र छल कपट में, विषय विकार स्वभाव ।।२४।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय) ०४/०६/२४**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
इंद्रियांचा विषय-प्रवाह वाढल्यामुळे चंचलता दिवसेंदिवस वाढत जाते आणि विचार कुत्सित झाल्यामुळे कुटिलता आणि कपट माणसाच्या जीवनात येऊ लागतं. विषयासक्त आणि विकारशील स्वभावात क्षुद्रता, छल, कपट वगैरे दुर्गुण येऊ लागतात. म्हणून इंद्रिय-प्रवाहाला संयमपूर्वक रोखून आपलं जीवन गतीमान केलं पाहिजे. जीवनाच्या उत्थानासाठी इंद्रियांचं संयमन अत्यंत आवश्यक आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## 'निजसुखगुणविश्रामा'

आधुनिक केसरी

अशी अ-युध्द( अयोध्या )नगरी आहे.राजा व प्रजा एकमेकांवर जीवापाड प्रेम करतात, कुणाला कशाचीही काही कमी नाही. सर्व जण ऐश्वर्यसंपन्न, शुध्दसाधना करत,सदाचारी, सद्विचार असलेली जनता ज्या नगरीत रहाते ती नगरी म्हणजे अयोध्या होय.
मित्रांनो मला सांगा असं सुखाचं आयुष्य जगण्याची कल्पनाच किती सुखावह आहे. आणि अशी नगरी ही तर आपल्या आदर्श संस्कृती चा अनमोल ठेवा आहे. मी तर म्हणेन अख्या जगाने या विषयावर चिंतन मनन केले पाहिजे. व सर्वांनी असं जगलं पाहिजे. प्रत्येक नावा मागे एक विचार आहे. श्रीराम-- ही एक प्रगल्भ विचारांची कल्पना आहे. जन्मलेल्या बाळा पासून ते शेवटच्या क्षणापर्यंत मुखातला राम अंतकरणात सतत तेवत ठेवला पाहिजे. आपल्या तील जाणीव,नेणीव,सत्यधर्म, सत्यवचन शेवट पर्यंत केले तरचं जीवनात राम आहे हे कधीही विसरू नये.
`सीता- ुध्दशील,शुध्दचारीत्र्य,तपस्या, पत्नीधर्म निभावणारी,केवळ स्वतः चाच नाही तर संपूर्ण कुळाचा विचार करणारी आदर्श भारतीय नारी.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## प्रपंचाच्या अपूर्ण गोष्टींत केव्हांही समाधान मिळणार नाही

आधुनिक केसरी

सर्व अनुभवांत आत्मप्रचीती ही खरी. दुसऱ्याने पुष्कळ अनुभव सांगितले, परंतु स्वतःला येईल तो अनुभव हाच खरा महत्त्वाचा. आत्मप्रचीतीने जागरूकता येईल, भाव वाढेल, साधनाला जोर येईल आणि भगवत्प्राप्ती लवकर होईल. संतांनी पुष्कळ गोष्टी आजवर आपल्याला सांगितल्या परंतु त्यांना देव जसा हवासा वाटला तसा आपल्याला वाटतो का ? प्रपंच करीत असताना भगवंताची आपल्याला आवश्यकता वाटते का ? आपण असा विचार करावा की, आपण लहानाचे मोठे झालो, विद्या संपादन केली, नोकरी मिळाली, लग्न झाले, मुलेबाळे झाली, घरदार केले परंतु आपल्याला अजून काहीतरी हवेसे वाटतेच आहे ! हे आपले 'हवेपण' केव्हा संपणार ?
आपण नोकरी करतो, कोणी वकिली, डॉक्टरकी; नोकरी करणारा, मालकाला आपल्याशिवाय दुसरा कोणी नोकर मिळणार नाही म्हणून काही नोकरी करीत नाही किंवा अशीलाला कोणी दुसरा वकील मिळणार नाही म्हणून वकील वकिली करीत नाही. म्हणजेच नोकरीवाला काय, डॉक्टर काय,



वकील काय कोणीही आपापले कर्म केवळ त्या कर्मासाठीच करीत नाही, तर त्यातून आपल्याला सुख मिळेल ह्या ईर्ष्येने तो ते करीत असतो. परंतु आपण पाहतोच की सर्व काही केले, आयुष्यही संपले, तरी काहीतरी करण्याचे राहूनच जाते; त्याला पूर्णता येत नाही. एखादी गोष्ट आपल्याला मिळाली की, आता ह्यापुढे काही करायचे उरले नाही असे काही वाटत नाही. आता काहीएक नको आहे, जेवढे आहे त्यात समाधान आहे असे कधी वाटते का ? पुढे कसे होईल, हे सर्व टिकेल का, ह्यात आणखी भर कशी पडेल याची विवंचना कायमच ! एखाद्याचे लग्न ठरले ते झाले की आता प्रपंचाची काळजी मिटली असे वाटते का ? लग्न झाल्यावर, समजा पाच वर्षे मूल झाले नाही, तरी हा काळजी करतोच; आणि समजा, मुलेच मुले झाली तरीही याची काळजी आहेच ! तेव्हा या प्रपंचाच्या गोष्टी अपूर्ण आहेत. त्यांतून समाधान लाभेल हे कसे शक्य आहे ? ह्या गोष्टी एकांतून एक निर्माण होणाऱ्या आहेत. ज्या ज्या म्हणून सुखाच्या गोष्टी मानल्या त्या सर्व जरी एकत्र केल्या तरी त्यांतून समाधान निर्माण होणार नाही. ज्या गोष्टी अपूर्णच आहेत त्यांतून पूर्णस्वरूप असलेले समाधान कसे लाभेल ? समजा, एका वेड्याच्या इस्पितळात दोनशे वेडे आहेत; जर कुणी म्हणाले की, आता आणखी शंभर वेडे आले की एक शहाणा त्यांतून निर्माण होईल, तर हे कधी शक्य आहे का ?

**आजचे बोधवचन आहे - ६८. मनुष्याला किती असले म्हणजे पुरे होईल हे ठरलेले नाही. आहे त्या परिस्थितीमध्ये आपण समाधान मानले की जे आहे ते पुरेल.**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

हो का नर अथवा नारी । रांड तयें नावें खरी ॥ध्रु.॥
नाहीं हातीं दान । शूरपणाचें कांकण ॥२॥
वाळियेली संतीं । केली बोडोनि फजिती ॥३॥
तुका म्हणे ताळा । नाहीं त्याची अवकळा ॥४॥
माया ब्रम्ह ऐसें म्हणती धर्मठक । आपणासरिसे लोक नागविले ॥१॥
विषयीं लंपट शिकवी कुविद्या । मनामागें नांद्या होऊनि फिरे ॥ध्रु.॥
करुनी खातां पाक जिरे सुरण राई । करितां अतित्याई दुःख पावे ॥२॥

मंगळवार, ४ एप्रिल २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२१२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक



● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● TUESDAY 4 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-212 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-14 ● PRICE-5

# अखतवाडे गावातील शेतकऱ्यांनी घेतले स्वत:ला कापसात गाडून

## भाव वाढीसाठी शेतकऱ्यांचे अनोखे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर : मागील वर्षी कापसाला प्रति क्विंटल १३ हजार ते १४ हजार रुपये भाव मिळाला होता. त्या तुलनेत यंदा चार ते पाच हजार रुपयांची घट झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. कापूस उत्पादक शेतकरी आता दरवाढीच्या मुद्यावर आक्रमक होत आहेत. विदर्भ, मराठवाड्याप्रमाणे आता पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्याच्या अखतवाडे गावात कापूस उत्पादक शेतकरीदेखील आक्रमक झाले आहेत.**



कापसाला चांगला दर मिळावा, अनुदान मिळावा या मागणीसाठी शेतकऱ्यांनी कापसात गाडून घेत अनोखे आंदोलन केले आहे. केंद्र सरकारकडे अनेकवेळा मागणी करूनही कापसाला प्रतिक्विंटल चार हजार रूपये अनुदान न मिळाल्याने अखतवाडे येथील संतप्त शेतकऱ्यांनी स्वतःला कापसात गाडून घेत सरकारचा निषेध व्यक्त केला. सकाळी नऊ वाजता अखतवाडे येथे शेतकरी विकास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत स्वतःला कापसात गाडून घेतले.

अहमदनगर जिल्ह्यात यंदा मोठ्या प्रमाणावर कापसाची लागवड झाली आहे. मधल्या काळात अतिवृष्टीचा पाऊस पडल्याने कापूस उत्पादनात मोठी घट झाली होती. एक एकरातून कापूस उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांना सुमारे २५ ते ३० हजार रूपये खर्च येतो. परंतु, सध्या बाजारात कापसाला मिळत असलेला भाव ७ हजार ५०० रुपये प्रतिक्विंटल हा उत्पादकांना न परवडणारा आहे, असे आंदोलकांनी म्हटले आहे. केंद्र सरकारकडे अनेक वेळा मागणी करून देखील कापसाला प्रतिक्विंटल चार हजार रूपये अनुदान मिळाले नाही, असे आंदोलक शेतकऱ्याने सांगितले. कापसाच्या दरात वाढ न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा यावेळी शेतकऱ्यांनी दिला आहे.

विदर्भ, मराठवाड्याप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी कापूस दरवाढ प्रकरणी आक्रमक झाल्यामुळे सरकारने तत्काळ योग्य तो निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकरी संघटनेकडून करण्यात आली आहे.

# सावरकरांच्या जन्मभूमीतून सावरकर गौरव यात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविरोधात केलेल्या अवमानास्पद विधानाच्या विरोधात शिवसेना आणि भाजपने सावरकर गौरव यात्रा काढून प्रत्युत्तर देण्यास प्रारंभ केला आहे. नाशिकमध्ये भगूर या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या गावापासून यात्रेला प्रारंभ झाला. यावेळी वीर सावरकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून यात्रेला प्रारंभ करण्यात आला.

राहुल गांधी यांच्या वक्तव्यानंतर राज्यभरात वातावरण तापले आहे. त्यामुळे देशाच्या स्वातंत्र्य चळवळीतील स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या योगदानाचे स्मरण करून देण्यासाठी 30 मार्चपासून 6 एप्रिलपर्यंत राज्यातील 288 मतदारसंघात सावरकर गौरव यात्रा काढण्याचा संकल्प भाजपा आणि शिवसेनेने सोडला आहे. त्याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळताना दिसत आहे. रविवारी सुटीच्या दिवशी विविध ठिकाणी



मिळून 100 हून अधिक यात्रा काढण्यात आल्या. नाशिकमध्ये देखील भाजपच्या वतीने सावरकर गौरव यात्रेला प्रारंभ झाला. भगूर येथील स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर जन्मस्थान स्मारकात भाजपा पदाधिकाऱ्यांनी अभिवादन केले. यावेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री विजय चौधरी उपस्थित होते. भाजपच्या असंख्य मान्यवरांनी स्मारकात जाऊन प्रतिमा पूजन केले.

नाशिक शहराच्या प्रमुख मार्गावरून गौरव यात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौकात आली. यावेळी भाजपचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर गौरव यात्रेचा श्रीफळ वाढवून शुभारंभ केला. ही यात्रा सिन्नर आणि इगतपुरी तालुक्याकडे मार्गस्थ झाली. राहुल गांधी यांनी सावरकरांविषयी एकही अपशब्द काढला तर त्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असा इशारा महामंत्री विजय चौधरी यांनी यावेळी दिला.

आज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये 288 विधानसभामध्ये सावरकर गौरव यात्रा होत आहे. या गौरव यात्रेचा प्रारंभ क्रांतीसुर्य सावरकर यांच्या सावरकर वाड्यातून होत असून मनस्वी आनंद होत असल्याची भावना महामंत्री विजय चौधरी यांनी व्यक्त केली. स्वातंत्र्यवीर सावरकरांबाबत काँग्रेसकडून वारंवार होत असलेल्या अवमानकारक वक्तव्यांचा निषेध करण्यासह सर्वसामान्य जनतेला सावरकरांचा इतिहास आणि त्यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाची माहिती देण्यासाठी आयोजित 'वीर सावरकर गौरव यात्रे'ला राज्यभरात उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

# मिल्कोमीटर प्रमाणीकरण बंधनकारक करण्याचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** दूध संकलन केंद्रांवर दूध तपासणीसाठी वापरण्यात येणाऱ्या सदोष मिल्कोमीटर व वजन काट्यांच्या विरोधात किसान सभेने आंदोलन सुरू केलं. तसेच या माध्यमातून शेतकऱ्यांची मोठी लूटमार केली जात असल्याचा आरोप केला. किसान सभेने या विषयावर वारंवार पाठपुरावा करत आंदोलन सुरूच ठेवले. यानंतर या पाठपुराव्याला यश मिळालं आहे. राज्य सरकारने दूध कंपन्यांना मिल्कोमीटर प्रमाणीकरण बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला आहे. किसान सभेने म्हटले दुधाचे भाव दुधातील फॅट व एस.एन.एफ.च्या प्रमाणानुसार ठरत असतात. फॅट व एस.एन.एफ. मोजण्यासाठी वापरण्यात येणारे मिल्कोमीटर हवे तसे सेट करता येत असल्याने सेटिंग बदलून दुधाची गुणवत्ता मारली जाते. त्याद्वारे शेतकऱ्यांची मोठी लूट करण्यात येते. दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समिती, विविध शेतकरी कार्यकर्ते व किसान सभेने याबाबत अनेकदा आवाज उठवून राज्य सरकारचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले.

# राहुल गांधींना न्यायालयाकडून जामीन मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांना सुरत न्यायालयाने



जामीन मंजूर केला आहे. मोदी आडनावाबाबत राहुल गांधी यांनी वादग्रस्त वक्तव्य केले होते. याप्रकणी त्यांना दोन वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. त्यानंतर त्यांनी जामीनासाठी अर्ज केला होता. आता प्रकरणी न्यायालयाने राहुल गांधींना जामीन मंजूर केला आहे. दरम्यान, आता पुढील सुनावणी 13 एप्रिल रोजी होणार आहे. राहुल गांधी यांनी सुरत कोर्टात मोदी आडनावावरुन झालेल्या शिक्षेविरोधात सोमवारी सुरत सत्र न्यायालयात याचिका दाखल आहे.

दरम्यान, शिक्षा स्थगितीच्या याचिकेवर आता पुढील सुनावणी 13 एप्रिल रोजी होणार आहे. राहुल गांधी यांनी मोदी आडनावाबाबत 2019 साली केलेल्या वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी त्यांना सुरत न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा सुनावली होती. तर या प्रकरणी दोषी असण्याचा निर्णय रद्द करण्यासंदर्भातील याचिकेवर 3 मे रोजी सुनावणी होणार आहे. सुरत कोर्टात राहुल गांधी यांनी दोन याचिका दाखल केल्या होत्या. त्यापैकी एक याचिका जामीनाबाबत होती. तर दुसरी याचिका दोषी असण्याला आव्हान देण्याबाबत होती. त्यानुसार 3 मे रोजी सुनावणी होणाऱ्या याचिकेत जर दोन वर्षाच्या शिक्षेला स्थगिती मिळाली तरच राहुल गांधींच्या खासदारकी बाबत निर्णय होईल.

सुरत सत्र न्यायालयाने आज दोषी असण्याच्या निर्णयाला स्थगिती दिलेली नाही, मात्र राहुल गांधी यांचा अर्ज दाखल करुन घेत, या प्रकरणी मूळ याचिका दाखल करणाऱ्या पूर्णेश मोदी यांनाही नोटीस जारी केली आहे. पूर्णेश मोदी यांनी या नोटिसीला 10 एप्रिलपर्यंत उत्तर द्यायचे आहे. राहुल गांधी यांना आज मिळालेला जामीन, आज त्यांनी दाखल केलेल्या अपीलावर निर्णय होईस्तोवर कायम असणार आहे. यापूर्वी शिक्षा सुनावताना सुरतच्या मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांनी स्वतःच सुनावलेल्या शिक्षेला एक महिन्याची स्थगिती देत, एक महिन्याचा जामीनही राहुल गांधी यांना दिला होता.

2019 च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान राहुल गांधी यांनी कर्नाटकातील कोलारमध्ये मोदी आडनावाबाबत वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे संपूर्ण मोदी समाजाच्या भावना दुखावल्याचा आरोप राहुल गांधी यांच्यावर करण्यात आला होता. त्यानंतर गुजरातमधील भाजप आमदारानं राहुल गांधी यांच्याविरोधात सुरत कोर्टात मानहानीचा खटला दाखल करण्यात आला होता. या खटल्याच्या विरोधात, न्यायालयाने राहुल गांधींना दोषी ठरवत शिक्षा सुनावली होती.

# पैसे उधळल्याचे समर्थन नाही; भ्रष्टाचाऱ्याच्या नांग्या ठेचल्याच पाहिजेत!

## आधुनिक केसरीच्या जन चर्चेत वाचकांच्या संतप्त प्रतिक्रिया; विहीर मंजुरीसाठी लाच मागितली म्हणून

आधुनिक केसरी

**विहिर मंजुरीसाठी लाच मागितली म्हणून फुलंब्री (जि. छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील गेवराई पायगा गावच्या सरपंचाने पंचायत समितीच्या बाहेरच दोन लाख रुपयाची उधळण केली. यामुळे हा तरुण सरपंच दिवसभर समाजमाध्यमावर चर्चेत राहिला. हे दोन लाख उधळले याचे समर्थन आम्ही करणार नाहीत. परंतु टेबलाखालून लक्ष्मीदर्शन घडविलयाशिवाय कोणतेच काम होत नाही ही वस्तुस्थिती आहे. हे मुरढावलेले भ्रष्टाचारी मुखवटे कसलीही लाज न बाळगता खुलेआम भ्रष्टाचार करताना दिसतात. या विषयाच्या निमित्ताने अनेक प्रश्न आज समाजासमोर उभे राहिलेले दिसतात. परंतु भ्रष्टाचारांच्या नांग्या ठेचल्याच पाहिजेत अशा संतप्त प्रतिक्रिया आधुनिक केसरीच्या जन चर्चेत वाचकांनी दिल्या.**

आधुनिक केसरी जनचर्चा

**प्रेताच्या टाळूवरची लोणी खाणारी मानसिकता आली...**



कोणते सांगा शिष्टाचार पाळू,
लोण्याने माखली प्रेताची टाळू
मी नाकारली चिरीमिरी डोम्बाला, तो
बोलला तुझे प्रेत उशीरा जाळू
तांब्याभर पाणी ओत म्हणाली नदी,
जर हवी तुला बांधकामासाठी वाळू
टेबलाखालून पैसे घेतल्याशिवाय काम न करण्याच्या कर्मचारी अधिकारी ह्यांच्या वृत्तीमुळे सामान्य जनता आणि कर्मचारी ह्यांच्यात मोठे अंतर निर्माण झाले आहे. कर्मचारी संप काळात सामान्य जनता कर्मचाऱ्यांना विरोध करत होती. लोकही नाईलाजाने पैसे देतो असे म्हणतात आणि लाचखोरीला बळकट करतात. एखाद्या अपघातातील मृतकाच्या पोस्टमार्टम पासून ते प्रेत तर बालकांच्या जन्म नोंदी घेण्यासाठी सुद्धा आज लाच द्यावी लागते अशी परिस्थिती आज देशात दिसते. ही अतिशय लाजिरवाणी बाब आहे. आज सर्वत्र प्रेताच्या टाळू वरचे लोणी खाणारी मानसिकता अस्तित्वात आली आहे. एकमेकांना दोष देऊन काही होणार नाही. सर्वांनी स्वतः पासून ना लाच देणार ना घेणार अशी शपथ घेत सुरुवात केली पाहिजे.

**- किरण शिवहर डोंगरदिवे, मो. 7588565576**

**भ्रष्टाचार मुळावर उठला..! :** दोन लाख उधळल्याचे प्रकरण गंभीर आहे.



शासकीय कार्यालयाच्या बाहेर हा तरुण सरपंच पोटतिडीकीने हा मांडत असलेला आक्रोश पाहिल्यावर मन संतप्त झाले. माणूस व्यवस्थेच्या बरबटलेपणाने हतबल झाला आहे. सर्वसामान्य, गोरगरीब, वंचित यांचे शासकीय काम लक्ष्मी दिल्याशिवाय होत नाही हे वास्तव लपवता येत नाही. मग संतापजनक अशी कृत्ये समाजमनाला विचार करण्यास भाग पाडतात. हे प्रकार थांबले नाहीत तर भ्रष्टाचाराचा येळकोट आपल्या मुळावर उठल्याशिवाय राहणार नाही.

**- दत्ताबापू काळुंके, मोबाईल- 9702240301**

**व्यवस्थेचा बरबटलेला चेहरा दिसला :** एका सरपंचावर ही वेळ येत



असेल तर गोरगरीब, वंचित घटकांचे प्रत्यक्ष हाल विचाराच्या पलीकडचे असतील. सरपंचाने केलेल्या कृत्यात प्रचंड आग, व्यवस्थेविरुद्ध रोष आहे. यातून व्यवस्थेचा बरबटलेला भयावह चेहरा मनाला व्यापून गेला. अशा प्रवृत्ती वेळीच ठेचून काढण्याची गरज निर्माण झाली असून ही संतापाची लाट पसरली तर यांची पळता भुई झाल्याशिवाय राहणार नाही.

**- अमर चव्हाण, मो. 9960391846**

**या कृतीतून व्यवस्था धडा घेणार का ?**



विहिरी मंजूर करण्यासाठी हजारो रूपये अधिकारी मागतात ते अशोभनीय आहे. अस्मानी आणि सुलतानी संकटात कायम शेतकरी पिचलेला आहे. आणि वरून शासकीय कामासाठी पैसे द्यावे लागतील तर हा संताप आज कार्यालयात आहे, उद्या रस्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. कायम आडचणीत असलेल्या शेतकरी राजाच्या वाट्याला अवहेलनाच आहे. शासकीय कर्मचाऱ्यांना भरगच्च पगारी असून देखील यांना भ्रष्टाचाराचे शेण खाल्याशिवाय या लोकांचे पोटचं भरत नाही. त्या तरूण सरपंचाने जेव्हा पैसे उधळत शेतकरी राजाची व्यथा मांडत आक्रोश केला त्याची व्यवस्थेने नोंद घेतली पाहिजे. परंतु सध्या ती प्रत्येकाची व्यथाच होऊन बसली आहे. हे कोणी तरी करायलाच पाहिजे होते. यातून व्यवस्थेने धडा घेण्याची आज गरज निर्माण झाली आहे.

**- सुधाकर देशमुख, मो. 9404635911**

# पाकिस्तानच्या कुरापती

आधुनिक केसरी

जम्मू काश्मीरमध्ये पाकिस्तानी ड्रोनने भारतीय हद्दीत टाकलेली शस्त्रास्त्रे आणि दारुगोळा जम्मू-काश्मीर पोलिसांनी जप्त केली आहेत. या शस्त्रांस्त्रांमध्ये चिनी बनावटीची तीन पिस्तूल, 48 काडतुसे आणि चार चिनी बनावटीची हँड ग्रेनेड्स असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. जम्मू-काश्मीरमधील सांबा जिल्ह्यातील राख बरुटिया गावाजवळ ही संशयास्पद हत्यारे सापडल्याचे सांगण्यात आले. हे गाव पाकिस्तानी सीमेलगत आहे. पीटीआयने याबाबतची बातमी दिली आहे. राख बरुटिया गावातील एका निर्जन ठिकाणी झुडुपाजवळ पिवळ्या पॅकेटमध्ये काही संशयास्पद वस्तू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली, त्यावरुन प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन पोलिसांनी ते संशयास्पद पॅकेट ताब्यात घेतले. हे पॅकेट सीमेपलिकडून ड्रोनच्या सहाय्याने या परिसरात टाकण्यात आले होते. त्यामुळे पोलिसांनी बॉम्ब शोधक पथक आणि फॉरेन्सिक तज्ञांसोबत या ठिकाणी तातडीने पोहोचत ते पॅकेट ताब्यात घेतले आणि त्याची तपासणी केली. त्यावेळी या पॅकेटमध्ये तीन पिस्तुले 48 काडतुसे आणि चार हँड ग्रेनेड्स असल्याचे आढळले. ही सर्व शस्त्रास्त्रे चीनी बनावटीची असल्याची माहिती जम्मू-काश्मीर पोलिसांनी दिली. सांबा जिल्ह्याचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक सुरेंद्र चौधरी यांनी प्रसारमाध्यमांना सांगितलं की, सर्व शस्त्रास्त्रे जप्त करुन फोरेन्सिककडे पाठवण्यात आली आहेत. पोलिसांच्या बॉम्बशोधक पथकाने घटनास्थळी पोहोचल्यावर त्या संशयास्पद पॅकेटमध्ये अत्याधुनिक स्फोटके नसल्याची खात्री केली. शनिवारी, राख बरुटिया आणि विजयपूर गावांच्या परिसरात एक संशयास्पद पाकिस्तानी ड्रोन उडत असल्याची माहिती मिळाल्यानंतर, सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी या ड्रोनवर गोळीबार करुन त्याला सीमेपलीकडे हुसकावले होते. त्यानंतर आज सोमवारी संशयास्पद ड्रोनने सांबा जिल्ह्यात शस्त्रास्त्रे टाकल्याचे उघड झाले. सांबा जिल्ह्यातील राख बरुटिया गावाजवळ सापडलेल्या शस्त्रांस्त्रानंतर या घटनेच्या तपासाने वेग घेतला आहे. राख बरुटिया गावाजवळ आज जप्त करण्यात आलेली शस्त्रास्त्रे, बीएसएफने हुसकावलेल्या ड्रोननेच टाकली आहेत की नाही, याचा तपास सुरु करण्यात आला आहे. गेल्या वर्षभरात तब्बल दोन डझनापेक्षा जास्त पाकिस्तानी ड्रोन या परिसरात बीएसएफकडून पाडण्यात आली आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये प्रत्यक्ष नियंत्रण रेषा वगळता भारत पाकिस्तान यांच्या दरम्यान, 192 किलोमीटरची सीमा आहे. यातून भारतात घातपाती कारवायांसाठी पाकिस्तानातून कुमक पाठवली जाते. त्यासाठी बहुतेक वेळा ड्रोनसारख्या साधनांचा वापर केला जातो. याआधीची अनेकवेळा पाकिस्तानकडून ड्रोनच्या सहाय्याने भारतीय हद्दीत शस्त्रास्त्रे टाकण्यात आली आहेत.

# काँग्रेसनेच घेतलाय 'राहुल गांधी'चा राजकीय बळी ?




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना वादग्रस्त विधानावरून न्यायालयाने दिलेली शिक्षा,त्यामुळे खासदारकी जाणे.ही भाजपा अथवा मोदी यांची खेळी नसून काँग्रेसच्या नेत्यांचीच आहे.यात गांधी यांना कायदेशीर योग्य दिला गेलेला नाही.यात काँग्रेसमधील गटाने गांधी यांची दिशाभूल केली व त्यांना जाणीवपूर्वक फसविले आहे.काँग्रेसने 'गांधी यांचा राजकीय बळी' घेतल्याची चर्चा आहे. दूसकुकडे भारतातील राजकीय घटनेकडे अमेरिका व जर्मन यांनी लक्ष्य घातल्याचे वृत्त आहे.याचे काँग्रेसने स्वागत केले आहे.हे भारतीय लोकशाही,न्यायव्यवस्था राजकारणात हस्तक्षेप करणे धोकादायक आहे.**

राहुल गांधी यांचेवरील कारवाईमुळे गांधी खानदान संतापल्याने काँग्रेस पक्षाने तातडीची बैठक घेतली. यात गांधी याच विषयावर चर्चा झाली. त्यातून पक्षाने गांधी नेतृत्व बचाव विरोधी पक्षाने 'भ्रष्टाचारांना बचाव' अशी भूमिका घेत आंदोलन करत आहेत.त्यासाठी काँग्रेसचे रोज नौटंकी चालू आहे. गांधी प्रकरणात नेमके कोठे चुकले ? कायदेशीर मते मांडली गेली. गांधी यांचे मानहानीचा खटल्यात योग्य बाजू मांडण्यात आलेली नाही, असे निर्दशनास आले. या खटल्याला वरिष्ठ न्यायालयात आव्हान देता गेले नाही. पक्षाच्या नामवंत कायदेतज्ज्ञांनी याकडे दुर्लक्ष केले ?तसेच गांधीनी माफी मागितली असती तर शिक्षा कमी झाली असती. तसे विविध प्रश्न उपस्थित केले गेले. काँग्रेस पक्ष स्वतः संशयाच्या भोवऱ्यात सापडला. पक्षाचा गाफीलपणा गांधींना भोवला! काँग्रेसने नेते खेडा यांना अटक होताच काही तासात सर्वोच्च न्यायालयातून स्थगिती आणली गेली होती.आता सुरत न्यायालयाचा निकाल १७० पानाचा असून तो गुजराती भाषेत आहे. त्यांचे भाषांतर करण्यास वेळ लागत आहे, असा काँग्रेस बहाणा करतेय! वास्तविक नवीन तंत्रज्ञान युगात कोणत्याही भाषच लगेच भाषांतर करता येते. सत्र न्यायालयात गुजराती भाषेतच याचिका दाखल करावी लागते. मग काँग्रेस दिरंगाई का करते आहे ? काँग्रेस पक्ष गांधी यांचा बचाव करत असला तरी त्यांना न्याय प्रक्रितूनच जावेच लागणार आहे. पण पक्षातील गाफीलपणाचे चुकीचे खापर कोणावर फोडणार ? असा प्रश्न होता. पक्षाने कारवाईचा बडगा उगारला तर पक्षात फूट पडेल, याचीही भीती वाटत होती.म्हणून या विषयावर भर दिला गेला नाही.काँग्रेस पक्षातील २३ ज्येष्ठ नेत्यांनी राहूल गांधी यांचे नेतृत्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण केले.त्यांचे नेतृत्वामुळे पक्षाला आहोटी लागत असून पक्षाचे अनेक नेते पक्ष सोडून गेले आहेत. नंतर गांधी यांनीच पक्षाचे नेतृत्व नाकारले, तेंव्हा प्रियंका वाड्राकडे पक्षाची सूत्रे देण्याची मागणी केली गेली होती. पक्षातील वारसदार कोण ? यावरुन गांधी व वाड्रा परिवारात अंर्तगत कलह चालू आहे. या श्रीमती सोनिया गांधी यांच्या म्हणण्यानुसार श्रीमती मेनका गांधी यांना घरातून हाकलून लावले गेले होते.गांधी व वाड्रा परिवारातील वादावर तात्पूरता पडदा टाकण्यासाठी गांधी घराण्याने नवी खेळी खेळली आहे. त्यांनी वफादार नेते खडगे यांचे नाव पक्षाध्यपदासाठी पुढे केले. आज खडगे जरी अध्यक्ष असले तरी पक्षाची सूत्रे गांधी घराण्याकडेच आहेत.यातून राहूल गांधी यांचेकरिता पक्ष दावणीला बांधला गेला आहे, हे दिसतेय! देशात यापूर्वी अनेक खासदार- आमदारांना शिक्षा झाल्यानंतर त्यांची सदस्यता रद्द झाली आहेत.तामीळनायडूच्या माजी मुख्यमंत्री जयललिता २०१४ मध्ये शिक्षा झाल्यानंतर त्यांचे सदस्य रद्द झाले. बिहार माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद यांना शिक्षेनंतर सदस्यत्व गेले. हिमालचप्रदेशचे काँग्रेसचे आमदार प्रदिप चौधरी २८ जानेवारी २०२१ मध्ये तीन वर्षाची शिक्षा झाली व यांचे सदस्य रद्द झाले. काँग्रेसचे राज्यसभेचे सदस्य रशीद मसूद, परवा लक्षव्दिपचे राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार मोहम्मद फैजल यांना दि१० जानेवारी २००३ मध्ये दहा वर्षाची शिक्षा झाली. १३ जाने. २०२३ मध्ये सदस्याचा रद्द झाली.त्यानंतर उच्च न्यायायलाने त्यांचे शिक्षेला स्थगिती दिल्यानंतर त्यांची सदस्यता बहाल झाली.सपाचे अब्दुल्ला आजमखान, नेते आजम खान, अनिलकुमार सहानी, भाजपाचे विक्रमसिंह सैनी, अनंतसिंह, कुलदिप सेंगर, जगदीश शर्मा या सर्वाचे सदस्य रद्द झालेले आहे. तेंव्हा गांधी हे एकमेव नाहीत.तेंव्हा काँग्रेस समाजवादी पक्ष, जनता दल, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने या कायद्याच्या विरोधात सत्याग्रह का केला नाही ? तेंव्हा गांधी हे कायद्यापेक्षा मोठे आहेत काय ? गांधींच्या सदस्यता रद्द झाल्याने विरोधी पक्षाचे पुतना मावशीचे प्रेम उतू आलेले आहे.पण या प्रकरणाबाबत मोदी यांच्या व्देष भावनेतून भाजपा सरकारवर खापर फोडले जात आहेत.मोदींमुळे गांधी यांना शिक्षा व कारवाई झाली, असा कांगावा केला जात आहे.या प्रकरणातून काँग्रेस पक्षाला सहानूभूती मिळेल, अशी रणनीती आहे.दिल्लीत काँग्रेस पक्षाने राहूल गांधी यांचे बचावासाठी संकल्प सत्याग्रह केला.म. गांधी हे आयुष्यभर अहिंसा व सत्य याच आदर्शावर विचारावर चालले. काँग्रेसने गांधींजींच्या या आदर्श विचाराचा स्विकार केला नाही. पक्षाने त्यांच्या राजकारणासाठी वापर करत आला आहे. म. गांधी यांचे हत्येनंतर गांधी विचाराच्या लोकांनीच निष्पाप ब्राह्मणांचे हत्याकांड घडविले. गोहत्या बंदीची मागणी करण्यावर संतावर गोळ्या झाडल्या. दिल्लीतील शिखांच्या हत्याकांडात काँग्रेस नेत्यांचा सहभाग होता. राम भक्तावर गोळ्या झाडणाऱ्या सरकाराचे काँग्रेसने समर्थन केले.या घटना पहाता काँग्रेसचे हात हिंसेने बरबटलेले आहेत.काँग्रेसची शंभर पाप भरले म्हणून तर मतदारांनी काँग्रेसची ही दशा केली आहे. गांधी परिवाराने सत्तेसाठी लोकशाही, घटना, कायदे पायदुळी तुडवली. आणीबाणीत लोकशाहीची हत्या केली गेली. काँग्रेसलने लबाडी करत भ्रष्टाचाराला शिष्टाचाराचा दर्जा दिला. या परिवाराने करोडोची माया जमविली आहे.लष्काराच्या शस्त्रास्त्र खरेदीत काँग्रेस दलाली खात होता. आता हा पक्ष लोकशाही मुल्याची आणि भ्रष्टाचार विरोधी भाषा करत आहे.काँग्रेसने अयोध्यात राम मंदिर उभारणीला विरोध केला.राम हे कल्पनिक आहेत, अशी भूमिका घेतली होती. जसे रावणाला मृत्यूसमयी तोंडात रामाचे नाव आले! तसे आता प्रियंका प्रभू रामांचे देऊ लागल्या आहेत.हा बदल आहे. गांधी परिवार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची घटना व त्या आधारित असलेले न्यायसंस्था व कायदे मान्य करत नाही.गांधी यांची विदेशात जाऊन भारतीय लोकशाहीवर प्रश्न चिन्ह निर्माण केले. त्यावर अमेरिका व जर्मनीने राष्ट्रांनी भारतातील घटनेवर लक्ष्य असल्याचे प्रतिक्रिया दिला आहे. त्याचे नेते दिग्विजयसिंह स्वागत केले.भारतीय लोकशाही, राजकीय घडामोडीत विदेशी शक्तींना हस्तक्षेप करण्यावरून काँग्रेसचे खडे बोल सुनावयास पाहिजे होते. यावरून भविष्यात देशातील लोकशाही, न्यायव्यवस्था व निवडणूकापर्यंत परकीय शक्तीचा हस्तक्षेप करू शकतात. काँग्रेस नेते मोदींना संपविण्याची भाषा करू लागले आहेत. जसा मासा पाण्याशिवाय तडफडतो, तशी काँग्रेस व गांधी परिवार सत्तेसाठी तडफडतोय! मोदी सरकारने गरीब, शेतकऱ्यांसाठी अनेक कल्याणकारी योजना, राष्ट्रहिताचे अनेक निर्णय घेतले.पण सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध करणे, हिच गांधी परिवाराची नीती राहिलेली आहे.यात गांधी परिवाराच्या हट्ट पुरविण्यात काँग्रेस पक्ष आहारी गेला. काँग्रेस पक्षाचा अंतर्गत मतभेदाचा इतिहास आहे. काँग्रेसचे अध्यक्षपद १९४७ पासून आतापर्यंत म्हणजे ७५ वर्षापर्यंत ४१ वर्षे पक्षाची सूत्रे ही नेहरू- गांधी परिवाराकडे राहिलेली आहे. काँग्रेस पक्ष जरी लोकशाहीची उदो, उदो करत असला, तरी नेहरू व गांधी परिवाराला लोकशाही मान्य नव्हती. १९४६ मध्ये काँग्रेसची कार्यसमितीची बैठक भारताच्या पहिल्या पंतप्रधानपदाच्या निवडीसाठी होती. यावेळी देशातील १५ पैकी १२ प्रदेश काँग्रेस समितीने स.वल्लभाई पटेल यांचे नावाचे प्रस्ताव दिले होते. तर तीन प्रस्ताव आचार्य कृपालानी यांचे बाजूने होते. पंडित नेहरू यांचे बाजूने एकही प्रस्ताव नव्हता. तर पण म.गांधी यांनी पं. नेहरू यांचे नाव पुढे केले, त्यामुळे नेहरू पंतप्रधान झाले.त्यानंतर श्रीमती गांधी यांचेकडे पक्षाची सूत्रे आली. काँग्रस पक्षातर्फे १९६९ मध्ये राष्ट्रपतीपदासाठी संजीव रेड्डी यांची उमेदवारी दाखल केली होती. पण श्रीमती इंदिरा गांधी यांनी पक्षाच्या विरोधात जाऊन सदस्यांना व्हि.व्हि. गिरी यांना मतदान करण्याचे आवाहन केले. त्यामुळे काँग्रसचे रेड्डी पराभूत झाले.काँग्रेस पक्षाने पक्षाने शिस्तभंगाची कारवाई करत श्रीमती इंदिरा गांधीं यांना पक्षातून काढले. त्यानंतर श्रीमती गांधी यांनी अखिल भारतीय काँग्रेस ( आर )स्वतंत्र पक्ष स्थापन केला.नंतर १९७१ मध्ये निवडणूक आयोगाने अखिल भारतीय काँग्रेस या नावाला संमती दिली. पुन्हा १९७५ मध्ये काँग्रेसचे मतभेद झाले.काँग्रेस पक्षाचे विभाजन झाले. गांधी परिवाराने पक्ष व सत्ता आपणाकडे राहावी, यासाठी अनेक नेत्यांना पक्षाचा बाहेर रस्ता दाखविला.श्रीमती सोनिया गांधी यांनी पक्षाचे ज्येष्ठ नेते व अध्यक्ष सीताराम केसरी यांना अपमानीत करून काढले.आज काँग्रेस पक्षात राहूल गांधी व प्रियंका गांधी यांचे नेतृत्व मानणारा गट कार्यरत आहेत, हेच सर्वश्रूत आहे. गांधी यांचे सदस्यत्व रद्द झाल्यानंतर ते काय बोलतात ? याकडे देशाचे नव्हे, तर मिडीयाचे लक्ष लागले होते.ते म्हणाले, मला तुरूगांत टाकले तर प्रश्न विचारणार! हे गांधी ९ वर्षापासून प्रश्न विचारत आहेत.पण त्यांनी प्रश्नाचे उत्तर शोधले नाही.तसेच ते मात्र विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर ते मात्र देत नाहीत.त्यात मराठी मिडीयाला तर पंतप्रधान मोदी, काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खडगे इतर मंत्र्यापेक्षा राहूल गांधी व प्रियंका वाड्राच्या यांचे बोलण्याला व विधानाला अधिक महत्व देत असतात, तो पहिल्या पानावरचा मुख्य मथळा होतो.भाजपाच्या नेत्यांनी गांधी परिवार व अदानी सबंधात संसदेत प्रश्न विचारले होते.पण मराठी मिडीया त्याला पहिल्यावर ठळकपणे प्रसिध्दी दिली नाही.त्यात गांधी यांचा खोटारडे बघा! २०१९ मध्ये गांधी कर्नाटकच्या सभेत मोदी आडनावाचे सर्व चोर म्हंटले होते. आदानी व मोदीच्या सबंधाचा प्रश्न २०२३ मध्ये विचारला होता. न्यायालयाच्या घटनेशी याचा कोठेही सबंध येत नाही.गांधी मोदी व अदानीवर प्रश्न केले! त्यात सत्यता किती आहे! हे कोण तपासणार ? भाजपानेही गांधी यांना माजी केंद्रिय कायदा मंत्री किरेन रिजीजू, माजी कायदा मंत्री रवीशंकर प्रसाद, मंत्री स्मृती इराणी, खा. शशिकांत दुबे यांनी गांधी व अदानीचे काय सबंध आहेत, ? अशी विचारणा केली. तसेच तत्कालिन पंतप्रधान स्व. राजीव गांधी, पी.व्ही नरसिंहराव, तसेच मनमोहनसिंघ यांच्या काळात अदानींना करोडाची कंत्राटे दिली ?मग काँग्रेसचे काय सबंध आहेत ? अदानीसोबत व वाड्रा, गहिलोत, बॅनर्जी, शरद पवाराचे छायाचित्र आहेत मग त्यांचे काय सबंध आहेत ? काँग्रेस सत्तेत असलेल्या छत्तीसगड राज्यात ११ हजार कोटी रू.तर राजस्थान मध्ये ६५ हजार कोटी रुपायांचे कंत्राट दिले.यात काँग्रेसचा वाटा किती आहे ?गांधी परिवाराचे चीनशी काय संबंध आहेत ? गांधी परिवार चीनच्या नेत्यांना गुप्तपणे का भेटतात ? या परिवाराने चीन नेत्यांशी कोणता गुप्त करार केला ? तसेच काँग्रेसने मोदी व शहा यांना विरोधात कटकारस्थान केले होते की नाही ?गांधी परिवार याचे उत्तर नाही.पण ते मोदींना प्रश्न विचारत राहणार! याचे आश्चर्य वाटते! गांधी परिवार या आरोपाला का बगल देतोय ?.गांधी परिवार खोटारडे, तथ्यहिन आरोप करण्यात सराईत आहे.गांधी म्हणतात, 'मी बोलतच राहणार'! गांधी स्वतः ला सत्यवान, गांधीवादी समजत असतील तर, ते अदानी व मोदी यांच्यात झालेला भ्रष्टाचार उघड करण्यासाठी कायदेतज्ज्ञांची फौज सर्वोच्च न्यायालयात उभी करतील! पण ही हिंमत राहुल गांधी व काँग्रेस पक्षात नाही.आज काँग्रेस पक्षाला काळे दिवस आले म्हणून की काय ? पक्ष नेते काळे कपडे स्वतःचे काळेनामे लपवित आहे. संसदेत कपडे घालून जाणे व अध्यक्षाच्या काळा कपडा फडकविणे हा तर संसदेचा अवमान आहे. यात गांधी यांचेवर दुहेरी नागरिकता प्रकरणाची केंद्रिय गृह विभागाकडून चौकशी चालू आहे. त्यातून त्यांची भारतीय नागरिकता जाण्याचा मोठा झटका बसू शकतो, असे भाजपाचे माजी खासदार व ज्येष्ठ विविज्ञ सुब्रम्हण्यम स्वामी यांनी सूचित केले आहे.गांधी यांचे विरोधात मानहानी, भ्रष्टाचाराचे खटले चालू आहेत! तेंव्हा त्यांना अजून धक्के बसणार आहेत!

# अहिंसेचे प्रतीक भगवान महावीर



आधुनिक केसरी

**जैन धर्माचे चोविसावे तीर्थांकर अहिंसेचे मूर्तिमंत प्रतीक भगवान महावीर यांची आज जयंती. भगवान महावीर यांचा जन्म वैशाली राज्याच्या कुंडलपूर येथे इसवी सन पूर्व ५९९ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सिद्धार्थ तर आईचे नाव त्रिशला असे होते. त्यांच्या भावाचे नाव नंदिवर्धन तर बहिणीचे नाव सुदर्शना असे होते. त्यांचे बालपण राजेशाही थाटात गेले. भगवान महावीर आठ वर्षाचे असताना त्यांना शिक्षण आणि शस्त्र विद्येचे प्रशिक्षण घेण्यासाठी शाळेत पाठवण्यात आले.**

भगवान महावीरांचे कुटुंब जैनांचे तेविसावे तीर्थांकार भगवान पार्श्वनाथ यांचे अनुयायी होते. भगवान महावीर २८ वर्षाचे असतानाच त्यांच्या आईवडीलांचे निधन झाले त्यानंतर त्यांनी श्रामणी दीक्षा घेतली आहे. त्यानंतर काही दिवसांनी त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले. त्यांनी १२ वर्ष मौन पाळले. हटयोग्याप्रमाणे त्यांनी शरीराला कष्ट दिले. ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी जनकल्याणासाठी उपदेश देण्यास सुरुवात केली त्यासाठी त्यांनी त्याकाळी प्रचलित असणारी अर्धमागधी भाषेचा आधार घेतला.इंद्रिय व विषय वासनेचे सुख दुसऱ्याला दुःख देऊनच मिळवता येते असे त्यांचे मत होते त्यामुळेच त्यांनी जैन धर्माच्या अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह याबाबींमध्ये ब्राम्हचर्याचाही समावेश केला. त्याग संयम, प्रेम करुणा, शील व सदाचार हे त्यांच्या प्रवचनाचे सार होते. त्यांनी चतुर्वेध संघाची स्थापना करुन समता हेच जीवनाचे लक्ष असल्याचे सांगितले. देशात ठिकठिकाणी फिरून भगवान महावीरांनी या पवित्र संदेशाचा प्रसार केला. इसवी सन पूर्व ५२७ मध्ये बिहार मधील पावापुरी येथे वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांचे निर्वाण झाले. तो दिवस होता कार्तिक कृष्ण अमावस्येचा. भगवान महावीरांच्या जन्म आणि निर्वाण दिनादिवशी घराघरात दिवे लावले जातात. भगवान महावीर म्हणतात की, जाणते किंवा अजाणतेपणातून कोणाची हिंसा करणे योग्य नाही. याशिवाय दुसऱ्याच्या मार्फतही कोणाची हिंसा घडवून आणू नये कुठल्याही जीवांना मन, शरीर किंवा बोलण्याने दंडित करू नये. सर्वांच्या आत एकच आत्मा आहे. आपल्या प्रमाणेच प्रत्येक प्राण्यांना आपापले प्राण प्रिय आहे त्यामुळेच कोणत्याही प्राण्यांप्रति हिंसा करू नये. स्वतः हिंसा करणारा, दुसऱ्यांकडून हिंसा घडवून आणणारा व दुसऱ्याने केलेल्या हिंसेचे समर्थन करणारा स्वतःप्रति द्वेष वाढवत असतो असे तेच मत होते. कोणत्याही प्रकारची हिंसा न करणे हीच ज्ञानाची खरी परिभाषा आहे. अशाप्रकारे त्यांनी ज्ञानाची व्याख्या केली आहे. आपल्या आत्म्याविषयी असणारा भाव इतर प्राण्यांविषयी असू द्या. सर्व प्राणिमात्रांविषयी अहिंसेचा भाव राखा मन, वाणी आणि शरीराने कोणाचीही हिंसा न करणारा खरा संयमी म्हणून गणला जातो अशी संयमी माणसाची व्याख्या त्यांनी केली. चालताना, बसताना, बोलताना, जेवण करताना असावध असणारा, स्वतःची पूर्ण खात्री झाल्याशिवाय, पहिल्या व विचार केल्याशिवाय कृती करणारा हिंसा करत असतो असे त्यांचे मत होते. दुःखास सर्वच जीव घाबरत असतात हे लक्षात घेऊन कोणत्याही जीवास कष्ट पोहचवणे टाळावे असे ते आपल्या प्रवचनात नेहमी सांगत.

**श्याम ठाणेदार, ९९२२५४६२९५**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पत्रकार अपमानास्पद वागणूक प्रकरणाची केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री पवारांकडून दखल

आधुनिक केसरी न्यूज

> सरकारी व्यवस्थेत माध्यमांना घटनात्मक दर्जा असून सरकारी व्यवस्थेचे व्यवस्थित मूल्यमापन ते करीत असतात. मात्र धार्मिक स्थळी पत्रकारांना प्रवेश नाकारला जात आहे. त्यामुळे ते सरकारी व्यवस्थेचे मूल्यमापन कसे करणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे आगामी काळात असे प्रकार खपवून घेतले जाणार नाही.
> **आण्णापाटील बोरगुडे, जिल्हाध्यक्ष, मराठी पत्रकार संघ**

आधुनिक केसरी IMPACT

**नाशिक :** वार्तांकन करण्यासाठी जात असलेल्या पत्रकारांना अपमानास्पद वागणूक मिळत असेल तर ती चुकीची आहे. चैत्रौत्सवानिमित्ताने खाजगी वाहनांस सप्तशृंगी गडावर जाण्यासाठी बंदी केली आहेच तर ती पारदर्शी पद्धतीने राबवली जावी, यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांशी बोलून कोणालाही ह्या नियोजन तथा सुरक्षा यंत्रणेचा विनाकारण त्रास होणार नाही याची काळजी संबंधित अधिकाऱ्यांना घेण्यास सांगितले जाईल अशी माहिती केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री भारतीताई पवार यांनी आधुनिक केसरीशी बोलतांना दिली. महाराष्ट्र पत्रकार संघ जिल्हा संपर्कप्रमुख किरण आवारे हे नाशिक जिल्ह्यातील सप्तश्रृंगी गड येथे वार्तांकन करण्यास जात असतांना नाकाबंदी करणाऱ्या पोलिसांनी त्यांचे वाहन अडवून त्यांना अपमानास्पद वागणूक दिली.

पोलिसांकडून पत्रकारांची वाहने अडवली जात असली तरी चिरीमिरी घेऊन खाजगी वाहने सोडण्यात येत असल्याचे तसेच नाकाबंदीच्या ठिकाणी काही खाजगी व्यक्ती लुडबुड करतांना व ते भविकांशी अरेरावी करत असल्याचे निदर्शनास आले. गडावरील खाजगी वाहने माध्यमांच्या निदर्शनास येऊ नये, चैत्रौत्सव काळात सर्व आलबेल असल्याचे दाखविण्यासाठी प्रशासनाचा हा खटाटोप आहे. भाविकांच्या अडीअडचणी माध्यमात येऊ नये यासाठी पत्रकारांच्या वाहनांना गडावर परवानगी नाकारण्यात येत असल्याने याबाबत विश्वगामी पत्रकार संघटनेने निषेध तर महाराष्ट्र पत्रकार संघाने न्यायालयात जाण्याचा इशारा दिला होता. याबाबत आधुनिक केसरी मध्ये वृत्त झळकताच हे वृत्त व्हायरल झाले. याची केंद्रीय आरोग्यराज्यमंत्री भारतीताई पवार यांनी दखल घेतली. कळवण येथील प्रांत तथा सहा.उपजिल्हाधिकारी विशाल नरवडे यांनीही या बातमीची दखल घेऊन याबाबत योग्य ती चौकशी केली जाईल अशी माहिती दिली. याबाबत नाशिक जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनाही अवगत करण्यात आले असून ते काय कार्यवाही करतात याकडे नागरिकांचे लक्ष लागून आहे.

# जिंतूर येलदरी रस्त्याची दुरवस्था; अपघात वाढले

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** येथील जिंतूरहून येलदरीकडे जाणारा रस्ता आधीच अरुंद असून त्यावर वाढलेली वाहतूक आणि रस्त्यावर पडलेले खड्डे यामुळे अपघाताच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. जिंतूरहून येलदरी कडे जाणाऱ्या रस्त्याला अनेक खेडी जोडलेली आहेत. त्यामुळे हा नेहमीच वर्दळीचा रस्ता आहे. त्यातच हा रस्ता अरुंद असून पॉलिटेक्निक कॉलेज समोर रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहन चालकास चांगलीच कसरत करावी लागत आहे.या रस्त्यावर पॉलिटेक्निक कॉलेज, डी एस एम कॉलेज तसेच न्यू ईरा इंग्लिश स्कूल कडे ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. जिंतूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या फिल्टर प्लॅटचे वाया जाणारे पाणी सतत या रस्त्यावरून वाहत असल्यामुळे दिवसेंदिवस खड्ड्यांची संख्या वाढत आहे. रस्ता अरुंद आणि खड्डे पडल्याने अपघाताची संख्या वाढली आहे. त्यामुळे या रस्त्यावरून ये -जा करणारे विद्यार्थी जीव मुठीत घेऊन प्रवास करत आहेत. फिल्टर प्लांटच्या वाया जाणाऱ्या पाण्याचा बंदोबस्त करून रस्त्यावरील खड्डे लवकरात लवकर दुरुस्त करण्यात यावेत अशी मागणी विद्यार्थी आणि पालकांकडून जोर धरत आहे.

# दिंडोरी तालुक्यात लालपरीला स्थानकांची प्रतीक्षा

## महत्त्वाच्या गावांना बसस्थानकच नाही

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** तालुक्याला औद्योगिक क्षेत्रातील पंढरी म्हणून संपूर्ण जिल्ह्यात नावलौकीक आहे. परंतु आजही तालुक्यातील महत्त्वाच्या गावांना लालपरीसाठी स्थानक नसल्याने प्रवासी वर्गाची मोठ्या प्रमाणावर हाल होतानाचे चित्र सध्याच्या मितीला दिसत आहे.

नुकतीच आदिवासी उप-योजनेतून दिंडोरी, पेठ, सुरगाणा, कळवण आदी ठिकाणच्या बसस्थानकांसाठी शासनाकडून ३५ कोटी रूपये मंजूर झाले असुन याठिकाणांच्या बसस्थानकांना झळाळी मिळणार असुन ज्या गावांना बस स्थानक नाही त्या गावांना बसस्थानक केव्हा मिळणार असाही सवाल प्रवासीकडुन निघत आहे.

तालुक्यातील लखमापूर, लखमापूर फाटा, वलखेड फाटा, अक्राळे फाटा, खतवड फाटा, वरखेडा तसेच तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील अनेक गावांना आजच्या मितीला बसस्थानक नसल्याने येथील प्रवासी, विद्यार्थी इ.ची मोठ्या प्रमाणावर हाल पाहायला मिळत आहे.फक्त " हात दाखवा बस थांबवा " या ब्रीद वाक्याप्रमाणे याठिकाणी बस थांबते.व प्रवासी वर्गाला ने-आण करते. विशेष म्हणजे लखमापुर फाटा हा दळणवळणांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे याठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्रवासी, नागरिक याची गर्दी मोठी असते. तसेच लखमापुर गावांतुन तालुक्यांच्या ठिकाणी जाण्यासाठी दहेगाव, वागळुद, म्हेळुसके, ओझे, करजंवण आदी ठिकाणचे प्रवासी मोठ्या प्रमाणावर येतात. परंतु येथेही बसस्थानक नसल्याने प्रवासी वर्गात नाराजी निर्माण होऊन संताप व्यक्त केला जात आहे. बसस्थानक नसल्याने भर उन्हाळ्यात व पावसाळ्यात मिळेल त्याठिकाणी

> ग्रामीण भागातील प्रवासी वर्ग लालपरीच्या प्रवासांला मोठ्या प्रमाणावर पसंती देतात. परंतु बसचा प्रवास करताना अनेक ठिकाणी बसस्थानके नसल्याने पावसाळ्यात, हिवाळ्यात प्रवासांना कुठेतरी टपरीजवळ, हॉटेल जवळ, अथवा दुकानच्या पडवीमध्ये जीव मुठीत घेऊन आश्रय घ्यावा लागत आहे .तेव्हा शासनाने निरीक्षण करून ज्या गावांला बसस्थानक नाही. त्याठिकाणी बसस्थानक निर्मिती करावी जेणेकरून प्रवासी वर्गाची होणारी गैरसोय थांबेल.
> **...अजित कड ( उपसरपंच दहेगाव ता .दिंडोरी )**



आश्रय घेऊन उभे राहावे लागते. तो पर्यंत बस निघुन जाते. त्यामुळे प्रवासी वर्गाची गैरसोय होते.

१९८१ ते २००१ पर्यंत लखमापुर फाट्यावर बसस्थानक होते. परंतु ते बसस्थानक आता नजरे आड गेले आहे. तालुक्यात काही गावांना बसस्थानक आहे. पण ज्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रवासी वर्गाची वर्दळ आहे. नेमके त्याच गावांना बसस्थानक नसल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहे. तालुक्यातील काही गावांना खासदार, आमदार निधीतून बसस्थानकांची निर्मिती करण्यात आलेली आहे. परंतु लखमापुरगाव, लखमापुर फाटा, वलखेड फाटा,वनारवाडी फाटा, अक्राळे फाटा, खतवड फाटा, पिंपळणारे फाटा इ.गावांना बसस्थानक का नाही ?असा संतप्त सवाल परिसरातील नागरिकांनमधून निघत आहे.

# जिंतुरात कृषी उत्पन्न बाजार समिती शिवसेना लढवणार

## शिव आशीर्वाद पॅनल तयार

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** जिंतूर तालुक्यातील बोरी व जिंतूर कृषी उत्पन्न बाजार समितीची नुकतीच निवडणूक प्रक्रिया जाहीर झाली असून त्यामध्ये शिवसेना (शिंदे गट) पूर्ण ताकतीनिशी निवडणूक लढवणार असून त्यामध्ये सर्व ठिकाणी उमेदवार देणार असल्याचे आज एक एप्रिल रोजी जिंतूर येथील शिवसेना कार्यालयात तालुकाप्रमुख ॲड. सुनील बुधवंत तर महिला तालुका अध्यक्ष सौ. अक्षदा राजेश चक्कर पाटील, संघटक अंकुश राठोड, शहराध्यक्ष गजानन गीते व इतर पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

या बैठकीत पक्षांच्या आदेशानुसार कृषी उत्पन्न बाजार समिती जिंतूर व बोरी येथील निवडणूक शिव-आशीर्वाद पॅनल अंतर्गत लढण्याचा निर्णय करण्यात आला व सर्व ठिकाणी उमेदवार लढणार असा निर्णय घेण्यात आला.





महाराष्ट्र Business Katta












# डॉ. आंबेडकर धर्माचे नव्हे कर्माचे महानायक



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे देशातीलच नव्हे जगातील एक विद्वान व्यक्तिमत्व व अष्टपैलू गुणवत्ता असलेले महान व्यक्ती होय. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शिक्षण, कायदा, अर्थशास्त्र, कृषी, ऊर्जा, जल अशा विविध क्षेत्रात काम करत असलेले एकमेव जागतिक विद्वान होत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य अखिल मानव जातीला एकत्र करून, एक समान मानून, समान संधी निर्माण करून देऊ शांतता प्रस्थापित करून देशाचे ऐक्य अबाधित ठेवण्यासाठी सर्वात मोलाचे आहे. परंतु दोन वर्षापासून विषमता व जातीवाद लोकांच्या मनामध्ये भिनलेला आहे. म्हणून आंबेडकरांचे कर्म न पाहता, फक्त महार जातीत जन्माला आलेले म्हणून त्यांच्या कार्यावर बोलू न शकणारे, त्यांनी केलेले जनकल्याण विसरणारे, अनेक जातीवादी, धर्मद्वेषी लोक समाजामध्ये आहेत.**

म्हणून त्यांनी कधी बाबासाहेब वाचले नाही व समजून घेतले नाही. आजची परिस्थिती बघितली तर शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी महिला सर्वजण अनेक समस्यांनी त्रस्त आहेत. या समस्या वरती उपाय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी त्याच वेळेस सांगितलेले आहेत. परंतु सरकार जनकल्याणकारी नसल्याने त्याची अंमलबजावणी होत नाही. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे शेतकऱ्यांचे, महिलांचे, कामगारांचे, शेतमजुरांचे नेते होते याची जाणीव लोकांना नाही. शेतकऱ्यांची खोती पद्धत बंद करून शेतकऱ्यांचे शोषण थांबवण्याचे महत्त्व पुर्ण काम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. कामगारांचे कामाचे तास सोळा तासावरून बारा तासावर आणि बारा तासावरून आठ तासावर आणण्याचे सर्वात मोठे काम बाबासाहेब आंबेडकरांचे आहे. महिलांचा मानसन्मान हक्क अधिकार व अस्तित्व बहाल करणारे, समान वेतन समान, समान नोकरी अशा प्रत्येक ठिकाणी सन्मान बहाल करणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरच. परंतु जातीच्या विचारांनी बरबटलेल्या लोकांनी अजूनही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना समजून घेतले नाही. जातीमध्ये बंदिस्त केले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण कार्य मग शेतकरी आंदोलन असेल, महिलांच्या न्याय हक्कासाठी आंदोलन असेल, सामाजिक न्यायासाठी आंदोलन असेल, शेतमजूर, कामगार, कामगारांसाठी आंदोलन असेल, भारतीय संविधानाचे कार्य असेल हे सर्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्मात असतानाच केले. परंतु खालच्या जातीतील लोकांनी वरच्या जातीतील लोकांना शिकवू नये, किंवा खालच्या जातीतील लोकांनी वरच्या जातीतील लोकांना शिकवले, त्यांचे ऐकले तर पाप लागते या पाखंडी विचारामुळे बाबासाहेबांचे विचार डोक्यात गेले नाहीत. म्हणून आजही लोकांच्या डोक्यातुन अंधश्रद्धा, अज्ञान, पाखंड हे टिकुन आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणजे स्वाभिमान सन्मान, विद्वत्ता, तर्कवाद आणि ज्ञानाचे भांडार होय.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन देशाला सर्वोत्तम जल पर्यटन मिळण्यासाठी नद्या जोड प्रकल्पाची संकल्पना समोर मांडली. परंतु तत्कालीन सरकारने त्यावरती लक्ष दिले नाही. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा नद्या जोड प्रकल्पाच्या मागचा उद्देश हा फक्त शेतीला पाणीपुरवठा करणेच नव्हे, तर शेतीला जोडधंदा निर्माण करून शेतकऱ्यांचे आर्थिक व सामाजिक जीवनमान उंच करण्याचा प्रयत्न होता. नद्या जोड प्रकल्पाच्या माध्यमातून वेगवेगळ्या ठिकाणी जल विद्युत निर्मिती केंद्र उभारणे, आणि वेगवेगळ्या ठिकाणी जल पर्यटन केंद्रे निर्माण करणे, हा उद्देश होता. नद्या वरती अनेक ठिकाणी सरकारच्या मालकीची विद्युत निर्मिती केंद्र असल्याने देशाला स्वस्तच नव्हे तर जगातील सर्वात स्वस्त वीज मिळणार होती. पर्यटनाच्या माध्यमातून विदेशी चलन भारतामध्ये मोठ्या प्रमाणात येऊन देशाची आर्थिक उन्नती होणार होती. तसेच काही ठिकाणी पूरग्रस्त व काही ठिकाणी कोरडा दुष्काळाची समस्या कायमची संपुष्टात येणार होती. असा दृष्टिकोन या नद्या जोड प्रकल्पाच्या मागे होता. महिलांचे न्याय, हक्क अधिकार सन्मान असेल ,संपत्तीमध्ये वाटा असेल, महिलांना निवडणुकीमध्ये मताधिकार असेल, या गोष्टी बाबासाहेबांनी मोफत देऊन महिलांचा सन्मान वाढविला. एवढेच नव्हे घरामध्ये महिलांना अगोदर जेवणाची मुभा नसताना सुद्धा पुरुषांप्रमाणे नोकरी, व पुरुषां इतकाच पगार मिळण्याची संधी बाबासाहेबांनी निर्माण करून दिली. असे सर्व घटकांचा विचार करून त्या घटकांचा कायमस्वरूपी विकास व्हावा व पुन्हा तो घटक समस्याग्रस्त होऊ नये, यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी कधीही जाती धर्माला महत्त्व दिले नाही. परंतु धर्माच्या नावाखाली माणसाचे शोषण होत असेल, अनिष्ट रूढी, परंपरेच्या नावाखाली शारीरिक व मानसिक हानी होऊन अज्ञान, अंधश्रद्धा व पाखंड पेरले जात असेल, तर या गोष्टी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी कधी मान्य केला नाही. धर्माच्या नावाखाली माणसा माणसात भेद करून माणसाला विकासापासून व संधी पासून दूर ठेवण्याचे काम केले जात असेल, तर हे सुद्धा बाबासाहेबांनी मान्य केले नाही. बाबासाहेबांनी समता विज्ञानवाद सामाजिक हक्क, अधिकार आणि न्याय दिला तर कोणत्याही धर्माचे नुकसान झाले नाही. आणि ह्या गोष्टी बहाल करताना ज्या लोकांना बाबासाहेबांनी आमच्या धर्माला विरोध केला असे वाटत असेल तर तो धर्म विषमता, अज्ञान, पाखंड यावरती असून जातीची उतरंड कायम ठेवुन, खालच्या जातीतील लोकांना हक्क अधिकार व संधी नाकारतो हीच सिद्ध होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्येक वेळेस ठणकावून सांगितले मी प्रथम भारतीय व अंतिमही भारतीयच आहे. आणि तसे काम सुद्धा त्यांनी केलेत. परंतु बाबासाहेबांना लोकांनी अजूनही समजून घेतले नाही आणि स्वतःचे अज्ञान दाखवून बाबासाहेबांना एका जातीमध्ये आणि धर्मामध्ये बंदिस्त करण्याचे काम आजही होत आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्यांच्यासाठी काम केले त्याच लोकांना त्याच समूहाला जाणीव नाही. आज महिला हक्क, अधिकार,प्रसुती रजा, समता, मानसन्मानाच्या गोष्टी करतात तेही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेचपण किती महिला व लोकांना याची जाणीव आहे. एकीकडे पायातील काटा काढल्याची जाणीव ठेवायला शिकवणारी भारतीय संस्कृती, आणि दुसरीकडे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकांचे जीवन सोन्याने मढवून देशात राजा होण्यास हक्क अधिकार बहाल केला. त्याच महापुरुषांबद्दल जाणीव नसेल ही संस्कृती आहे तरी कोणाची ? आम्ही जात धर्म मानत नाही असे म्हणणाऱ्या लोकांनी अजूनही बाबासाहेबांचे विचार व कार्य समजून घेतले नाहीत, व बाबासाहेबांचे पुस्तके व फोटो ही घरात लावले नाहीत तर त्याला काय म्हणावं ? डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने आजही देश चालला तर प्रत्येकाचे कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही. परंतु त्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य व विचार समजून घेणे गरजेचे आहे. आणि हे समजून घेताना माणसाच्या अधोगतीला कारणीभूत असलेले अज्ञान, अंधविश्वास, पाखंड याला कुठेही धारा नाही. आणि म्हणून अनेक लोकांना बाबासाहेबांच्या विचारांमध्ये व कार्यामध्ये अंधविश्वास अज्ञान पाखंडी आणि विषमता दिसून येत नाही. म्हणून ते विचार पटतही नाहीत. परंतु आज देशाला पुन्हा एकदा सावरायचे असेल तर बाबासाहेबांच्या कार्याची व विचारांची पेरणी समाजामध्ये करणे आवश्यक आहे. बाबासाहेबांनी संपूर्ण देशाला सुख, समाधान, समृद्धी शिक्षण सामाजिक न्याय हे सर्व फक्त दिलेले आहे. आणि आज या समोरच प्रश्नचिन्ह उपस्थित झालेले आहे. हे प्रश्नचिन्ह सोडवायचे असेल तर फक्त आणि फक्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हेच यावरती उत्तर आहे. आणि म्हणून जाती-धर्माची घान डोक्यातून काढून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य लक्षात घेऊन प्रत्येक भारतीयांनी वागणे आवश्यक आहे. भारतीय संस्कृती जगात चांगली आहे याचा डोंबारा पिटणारी, आणि लोक आम्ही जाती धर्माला मानत नाही तर त्याच्या कलागुणांना व विद्वत्तेला मानतो असे म्हणणारे लोक मग डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे कला, गुणविद्वत्ता अखिल जगाने मान्य केलेले असताना ही बाबासाहेब आंबेडकर भारत देशातच दुर्लक्षित आहेत. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य समाजामध्ये जाणार नाहीत यांची पूर्ण व्यवस्था निर्माण केली आहे. म्हणून आपण व्यवस्थेला फटकारून बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य आत्मसात करून घेणे आवश्यक आहे. तरच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे धर्माचे नव्हे तर कर्माचे आहेत याची जाणीव देशाला होईल.



# स्वातंत्र्यवीर सावरकरांना राहुल गांधी टार्गेट का करतात ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**काँग्रेस नेता राहुल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली देशात भारत जोडो यात्रेची नुकतीच भ्रमंती झाली. आंध्र, कर्नाटकातून देगलुर सीमेवर आल्यानंतर नांदेड-हिंगोली-वाशिम-अकोला-शेगाव नंतर नागपुर असा यात्रेचा मार्ग आढळुन येतो. महाराष्ट्रातून मार्गक्रमण करताना राहुल गांधींनी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी इंग्रजाकडे माफी मागितली अशा प्रकारची गरळ ओकत जाहिर आरोप सावरकरांवर लावला. खरं म्हणजे देशभक्तांच्या अंगात संताप झाला. प्रतिक्रिया विद्युत प्रवाहासारख्या उमटल्या. प्रश्न असा पडतो अधुन मधुन राहुल गांधी बालिशपणाचं राजकारण करताना सावरकरांना टार्गेट का करतात?, मागचा उद्देश काय?, यापुर्वी दिल्लीतुन असंच वक्तव्य त्यांनी केलं. पण आता महाराष्ट्र भुमी सावरकरांची जन्मभुमी त्या भुमीवर येवुन राहुल गांधींची हिंमत होतेच कशी?**

असा सवाल आता जनतेलाही पडला.मुळात राहुल गांधी यांचं राजकारण बालिशपणाचं असुन काँग्रेस समुळ नष्ट होण्यामागे तेच एक नेतृत्व याची खात्री आता काँग्रेसजनांनाही पटली. आश्चर्य म्हणजे आपल्या देशाचं राष्ट्रगीत याचाही थांगपत्ता ज्या नेतृत्वाला नाही, त्यांच्यात राष्ट्रभक्ती येणार तरी कोठुन ?

भारत जोडो यात्रा मागच्या महिन्यात राहुल गांधींनी काढल्यानंतर महाराष्ट्रात प्रवेश करताच सावरकरांचा विषय काढून नेहमीप्रमाणे हिंदुत्ववाद्याला डिवचलं होतं. राज्यात काँग्रेस पक्ष महाविकास आघाडीत सहभागी असुन अडीच वर्षे सत्तेत होता. अर्थात जनता विरोधी कारभार महाविकास आघाडीचा लोकांनी पाहिलेला कदाचित तो रोष नको म्हणुन विशिष्ट भागातुन यात्रा मार्ग शोधला असावा. राहुल गांधींच्या यात्रेत महाविकास आघाडीच्या सर्व प्रमुखांनी सहभागी व्हावं असा प्रयत्न प्रदेश काँग्रेसने केला होता. पण राष्ट्रवादी पक्षाचे जेष्ठ नेते शरदचंद्रजी पवार तथा शिवसेनेचे मा.उद्धवजी ठाकरे यांनी यात्रेपासुन दुर रहाण्यात पसंत केलं. कदाचित राहुल गांधींच्या पंक्तीत आपण बसु शकत नाहीत. म्हणुन आदित्य आणि रोहीत या लेकरांना काही काळ पायपीट करायला पाठवलं. एक गोष्ट निश्चित म्हणावी लागेल उद्धव ठाकरेंनी यात्रेपासुन चार हात दुर रहाण्याचा निर्णय घेतला होता. पवार साहेबांची प्रकृती बरी नाही. म्हणुन निमित्त असलं तरी अजितदादा पवार यात्रेत कुठेच पहायला मिळाले नाहीत. दया कुछ तो गडबड है कारण भविष्यात काही राजकिय उलथापालथ झाली तर शिवसेना-ठाकरे आणि राष्ट्रवादी दोन पक्ष एकत्र येतील त्यांच्यासोबत काँग्रेस असेल का नाही ? शंकेची पाल मनात यासाठीच चुकते कारण मोठे पवार आणि मोठे ठाकरे यात्रेत सहभागी झाले नाहीत. भारत जोडो यात्रा पुलाखालुन पाणी वाहुन गेल्यानंतर काँग्रेस पक्षाने काढली असंच म्हणावे लागेल. उशिरा सुचलेलं शहाणपण असंही म्हटलं तरी चुकीचं ठरणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसमुक्त नारा दिल्यानंतर संपुर्ण देशात काँग्रेसचं उच्चाटन झालं. अगदी संसदेत विरोधी पक्ष नेता एवढं बळसुद्धा त्यांच्याकडे मिळालं नाही. मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश सारख्या राज्यात राहुल गांधींच्या नेतृत्वाचा दारूण पराभव झाला. राजस्थान काठावर आलं. काँग्रेसमधील अंतर्गत धुसफुस केवळ राहुल नेतृत्वामुळेच वाढली. मध्यंतरी जेष्ठ नेत्यांनी गांधी नेतृत्वाविरोधात मोहिम उघडली होती. पृथ्वीराज चव्हाण, गुलाब नबी आझाद त्यापैकीच एवढेच नव्हे या पक्षातुन गुलाब नबी आझाद अखेर आझाद झाले. 19वर्षानंतर संघटनात्मक निवडणुका पक्षाला घ्याव्या लागल्या. त्यातही निवडणुक झाली. शेवटच्या क्षणी खरगे यांना उमेदवारी पक्षाने दिली पण शशी थरूर यांनी माघार घेतली नाही. याचाच अर्थ नेतृत्वाची हुकुमत पक्षात राहिली नाही. अनेकजण काँग्रेसमधुन बाहेर पडले. खरं म्हणजे राहुल गांधी यांचं नेतृत्व बालिशपणाचं प्रयोग सिद्ध करणारं नेहमीच राहिलं. दोन वर्षापुर्वी संसदेत पंतप्रधानाच्या जवळ जावुन दाखवलेला बालिशपणा अंगलटच आला होता. त्या नेतृत्वाला वैचारिक प्रगल्भता नाही. कुणावर कसे आरोप करतील ?याचा नेम लागत नाही. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी म्हणे इंग्रजांची माफी मागितली असा आरोप त्यांनी पुर्वीही केला होता. खरं तर सावरकरांचं वाचन त्यांनी केलंच नसावं तर दुसरीकडे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सावरकरांनी निभावलेली भुमिका, त्यांचा झालेला छळ पण राष्ट्रभक्तीचा यज्ञकुंड असल्याने जाज्वल्य इतिहास, हिंदुत्वाचं प्रतिक देशाला माहित आहे. पण हे बालिश नेतृत्व ज्यांची लायकी सावरकरांचं नाव घेण्याची सुद्धा नाही. काय तर म्हणे ? सावरकरांनी माफी मागितली. भारत जोडो यात्रा काढण्या मागचा उद्देश कदाचित राहुल गांधींनी महात्मा गांधींच्या यात्रा, बाबा आमटेंचे चरित्र वाचुन करण्याचा प्रकल्प म्हणावा लागेल. पण नेतृत्व त्यांच्या र्‍हदयातला सेवाभाव, राष्ट्र समर्पित भावना या सद्‌गुणाचा आणि राहुल गांधींच्या स्वभावाचा कुठेच ताळमेळ बसत नाही. ज्यांना आपल्या यात्रेत राष्ट्रगीतसुद्धा भारताचं कसं लागेल ? याची काळजी घ्यावीशी वाटली नाही. नेपाळचं राष्ट्रगीत वाशिमच्या सभेत सुरूवातीला वाजलं पण ते जाणिवपुर्वक निश्चित असावं. कारण कुठलाही भारतीय नागरिक आपल्या पेनड्राईव्हमध्ये दुसऱ्या देशाचं राष्ट्रगीत भरून घेवु शकत नाही. तो एक राष्ट्रभक्तीचा संस्कार आहे. स्वाभिमान जागर म्हणावा लागेल. पण ज्यांच्या नेतृत्वात राष्ट्रभक्तीच नसेल तर त्यांच्याकडून अपेक्षा काय ? महाराष्ट्र ही स्वातंत्र्यवीराची भुमी म्हणुन ओळखल्या जाते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी सावरकरांनी दिलेला लढा किती कठीण ? प्राणात्यागीत देशभक्तीचं जाज्वल्य होता. त्याच सावरकरांचा अपमान त्यांच्याच भुमीत येवुन राहुल गांधी करण्याची हिंमत करतोच कसा ? खरं म्हणजे कै.यशवंतराव चव्हाणांनी सुद्धा सावरकरांची राष्ट्रभक्ती मान्य केलेली होती. कारण त्यांच्या कृष्णाकाठ चरित्रात त्याचा उल्लेख आढळतो. स्व.इंदिराजी यांनी देखील तत्कालीन काळात काही लिखित पत्रे लिहिली. पण या बेताल राहुल गांधीला सुचनार कुठुन ? महाराष्ट्राच्या भुमीत येवुन सावरकरांचा अपमान कशामुळे केला असेल ? कारण याचे परिणाम निश्चित भविष्यात काँग्रेसला भोगावे लागतील. तिथे यात्रा बित्रा कुछ नही. कारण हिंदुत्व आणि राष्ट्रभक्ती विचारसरणीची माणसं सावरकरांच्या प्रतिभेला मरणोत्तर तडा जावु देणार नाहीत. कारण राहुल गांधींनं आरोप केल्यापासुन महाराष्ट्रात संतापाचा उद्रेक झाला. अगदी ठाकरे शिवसेनेला सुद्धा परिणामाची जाणिव लक्षात येताच त्यांनी अर्थात संजय राऊतांनी स्पष्टपणे राहुल गांधींवर टिका केली. अपमान सहन करणार नाही म्हणत महाविकास आघाडीत फुट पडु शकते असे संकेत दिले. अर्थात येणाऱ्या काळात राष्ट्रवादीसोबतच आम्ही युती करणार हे सांगायला राऊतांनी बाकी ठेवलं तो भाग वेगळा. भारत जोडो यात्रा जास्तीत जास्त प्रसिद्ध केंद्रित कशी व्हावी ? या विवंचनेत राहुल गांधींनी सावरकरांचा अपमान केला असावा. सोबतीला प्रदेश अध्यक्ष नाना पटोलेसारखे अविचारी माणसं डोक्यात घालुन द्यायला कमी नाहीत. कारण राज्यात असो की देशात काँग्रेसला जनाधार मुळीच राहिला नाही. परवा देखील एका पत्रकार परिषदेत बोलताना राहुल गांधींनी माफी मागायला मी सावरकर नाही असं म्हणत ज्ञानाचे दिवे पाजळले. खरं तर वाचाळ बडबडीमुळे सुरतच्या न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा ठोठावली. केंद्रिय संसद सचिवालयाने खासदारकी रद्द केली. तरी देखील जाणिवपुर्वक सावरकरांचा अपमान राहुल गांधी करतात. काँग्रेसची मुळात ही नितीच असुन ठाकरे शिवसेना अपमान सहन कसा करतात हाच प्रश्न पडतो.मालेगावच्या जाहिर सभेत उद्धव ठाकरेंनी राहुल गांधींना ठणकावलं पण दुसऱ्याच दिवशी खा.संजय राऊतांनी दिल्लीत जावुन त्यांचा मुका घेतला. काय तर म्हणे आता राहुल गांधी सावरकरांवर बोलणार नाहीत पण या माणसाने किमान दहा वेळा सावरकरांचा अपमान केला हा संताप खऱ्या अर्थाने राष्ट्रभक्त भारतीयांमध्ये निश्चित मनात आहे. भाजपाने सावरकर गौरव यात्रा काढली. उद्देश हाच आहे ज्या सावरकराला राहुल गांधींनं नेहमीच अपमानित केलं त्याचं महत्व आणि महात्म्य नव्या पिढीला कळायला हवं.





# मराठी कविता आणि गजलेचं वैभव वाढवणारे लोक !

संयमाचा परीघ



चित्र : बाबूराव पाटील, भोकर




प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : २२

**परवा डॉ. यशवंत मनोहर आणि भीमराव पांचाळे सरांचा वाढदिवस संपन्न झाला. त्या निमित्ताने या सूर्यकुळाच्या सृजनशील माणसांना साधा फोनही करता आला नाही ना चार शब्दही लिहिता आले नाहीत. आज सदराच्या नितिताने विचार करताना हे कांही लिहून झालं. या दोन जिव्हाळ्याच्या मंडळींसोबतच मराठी भाषा, साहित्य, समाज आणि समज अशा सगळ्या कारणासाठी मला ही विचारप्रवाहात आलेली मंडळी वंदनीय वाटते.या सृजनशील माणसांबद्दल नितांत आदर असण्याचं कारण हे की ही सगळी मंडळी कवितेच्या अंगानं माझ्या जिव्हाळ्याचे.परवा यशवंत मनोहर सर सरआणि गजलनवाज भीमराव पांचाळे दादांचा वाढदिवस होता. स्व. सुरेश भटांचा स्मृतीदिनही होता. या निमित्तानं एकूणच विदर्भाबद्दल विचार करताना हे काही सूचंत गेलं.**

आधुनिक केसरी

*जपून रे माझ्या फिनिक्स पक्षांनो !*
*डॉ. यशवंत मनोहर*
*जपून रे माझ्या फिनिक्स पक्षांनो जपून जरा*
*पायाखाली सुरूंग आणि माथ्यावर आगीचा ढग*



*ओथंबून आहे.*
*जपून रे माझ्या फिनिक्स पक्षांनो जपून जरा*
*खूपदा आपला इथे वध झाला आहे.*
*या जंगलातील खुळ्या अंधाराला*
*चालत नाहीत सूर्य आपले*
*जपून रे निखाऱ्यांनो जपून जरा*
*नास्तिकाचे कुळ आपले.*
*अशक्यच नाही ज्वालांचे वादळ आणि*
*रक्ताच्या समुद्रात नावा आपल्या*
*जपून रे नावाड्यांनो जपून जरा*
*उरात क्रांतीची कविता आपल्या.*
*आपल्या हातानेच देश आपल्या*
*सुगंधाचा इतिहास लिहितो आहे*
*जपून रे सौंदर्याच्या शिल्पकारांनो जपून जरा*
*इथला हरेक कागद बेईमान आहे.*
*जपून रे माझ्या फिनिक्स पक्षांनो जपून जरा*
*खूपदा आपला इथे वध झाला आहे.*

डॉ. यशवंत मनोहर यांची ही सुप्रसिद्ध कविता आपण अनेकदा ऐकली वाचली तरी पुन्हा पुन्हा ऐकावी, वाचावी वाटते ती यासाठी की कायम जगणं अंधाराच्या दडपणाखाली चिरडलं चाललंय. नवोन्मेशांना श्वास घेणं आवघड आवघड झालं आहे आणि मन मोकळं करण्यावर प्रचंड अडचनी आल्या आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होताना बघतो आहोत आपण दैनंदिन आयुष्यात.अशा वेळी या कवितेची आणि विद्रोही कवितेचा कणा असलेले कवी डॉ यशवंत मनोहर सरांची आठवन होणं स्वाभाविक आहे. परवा सरांचा वढदिवस होता, मला कार्यबाहुल्यामुळं फेसबुकावर शुभेच्छाही देता आल्या नाहीत. आदरणीय सर ! आपल्या हातून थकल्या-भागल्या जगण्याला बळ बळमिळंत राहो !

**महाराष्ट्राचा मराठी गजल गायक गजलनवाज भीमराव पांचाळे**

या सगळ्या कवींसोबत समांतर आपली स्वतंत्र प्रतिमा तयार केलेली अजून एक व्यक्ती माझ्या जगण्याचा अविभाज्य भाग होवून बसला आहे. आपल्या शब्दप्रधान, भावरम्य गायकीने ते मराठी माणसांच्या काळजात कधी जाऊन बसले कळलं नाही.गजलसागर प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्यांनी मराठी गजलेचं पुनरुज्जीवन केलं आणि आज मराठी माणसाच्या कानाला गजल गोड लागते ते केवळ भीमराव पांचाळे दादांमुळं. सुरेश भट, संगीता जोशी,इलाही जमादार आणि ए के शेख यांच्या गजला आज रशीकांच्या हृदयात जागा करु शकल्या ते केवळ भीमराव दादांच्या गजल लेखणाच्या कार्यशाळा, अखिल भारतीय गजल गजल संमेलनं, गजलसागर प्रतिष्ठानची प्रकाशनं आणि गावोगावी त्यांच्या भावरम्य गायकीने मराठी मन तरल तलम आणि तरन्नुममधे आलं. हा मनुष्य ज्यांनी ऐकला, जे लोक यांना भेटले त्या सगळ्यांचा अनुभव कुण्या आपुलकी जिव्हाळ्याला भेटून आल्यासारखे वाटल्या वाचून राहणार नाही.

*जखमा कशा सुगंधी झाल्यात काळजाला,*
*केलेत वार ज्याने तो मोगरा असावा."*

*हा इलाही जमादारांचा शेर, ही गजल आणि भामराव पांचाळे दादांची गायकी यांना वेगळं करणं अवघड. परवा दादांचा वाढदिवस झाला. त्यांना आरोग्यदायी दिर्घायुष्य लाभो, हीच प्रार्थणा !*

*इतकेच मला जाताना सरणावर कळले होते !*
(गजल) सुरेश भट


*इतकेच मला जाताना सरणावर कळले होते*
*मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते.*
*ही दुनिया पाषाणांची बोलून बदलली नाही,*
*मी बहर इथे शब्दांचे नुसतेच उधळले होते.*
*गेलेल्या आयुष्याचा मधुमास गडे विसरू या,*
*पाऊल कधी वाऱ्याचे माघारी वळले होते ?*
*मी ऐकवली तेव्हाही तुज माझी हीच कहाणी*
*मी नाव तुझे तेव्हाही चुपचाप वगळले होते.*
*याचेच रडू आले की जमले न मला रडणेही*
*मी रंग तुझ्या स्वप्नांचे अश्रूंत मिसळले होते.*
*नुसतीच तुझ्या स्मरणांची एकांती रिमझिम झाली*
*नुसतेच तुझे हृदयाशी मी भास कवळले होते. घर माझे शोधाया मी वाऱ्यावर वणवण केली जे दार खुले दिसले ते आधीच निखळले होते. मी एकटाच त्या रात्री आशेने तेवत होतो*
मी विझलो तेव्हा सारे आकाश उजळले होते.


आयुष्यभर मराठी गजल आणि गाणी लिहित राहिलेला हा मराठी भाषेचा भुषणावह कवी तथा गजलकार सुरेश भट यांचं जगणं आणि गजल यामधे अंतर करता येत नाही.मराठी संगीत सृष्टी, सिनेसृष्टी आणि साहित्य विश्व भारावुन टाकलेला हा कवी आज मराठी गजलेसाठी लकप्रिय आहे.परवा १४ मार्चला त्यांचा स्मृती दिन अंबाजोगाईत गजलकार नितीन देशमुख यांना 'सुरेश भट स्मृती पुरस्कार' देऊन संपन्न झाला.हा कार्यक्रम सन्मित्र गायक राजकुमार ठोके महोदयांनी आपल्या संगीत विद्यालयाच्या वतीने संपन्न केला. ही आमच्याही वतीने वंदनीय सरेश भटांना भावपूर्ण आदरांजली आणि सन्मित्र गजलकार नितीन देशमुख यांचे हार्दिक अभिनंदन !

**भय इथले संपत नाही**
**ग्रेस**

*भय इथले संपत नाही, मज तुझी आठवण येते मी संध्याकाळी गातो तू मला शिकविली गीते. ते झरे चंद्रसजणांचे ती धरती भगवी माया झाडांशी निजलो आपण झाडात पुन्हा उगवाया.*

*तो बोल मंद हळवासा आयुष्य स्पर्शुनी गेला सीतेच्या वनवासातील जणु अंगी राघव शेला. स्तोत्रात इंद्रिये अवघी गुणगुणती दुःख कुणाचे हे सरता संपत नाही चांदणे तुझ्या स्मरणाचे. ही कवी ग्रेस यांची घरोघरी पोंचलेली ती लता मंगेशकरांच्या सुश्राव्य आवाजातुन.ही कविता फार धीरगंभीर परंतू सहज रंध्रारंध्रातून गुणगुणंत लोक.भवतालातल्या कधीच न संपना-या दुःखाशी, यातनांशी आपल्या मनाला आतून कनेक्ट करुन टाकते. गा गहन गूढ प्रतिकं आणि प्रतिकांनी सामान्यांच्या पोंचेच्या पलिकडं जावून बसवेला तिनही भाषांवर आपली हुकुमत गावणारा कवी त्याच्या अंतरंगात एकदा का घुसलोत की कसा साधा सोपा सुंदर होवून जातो.*





**माय**
**स.ग.पायपोळ**

*हंबरून वासराले चाटती जवा गाय*
*तवा मले तिच्यामंदी दिसती माझी माय*
*आयाबाया सांगत व्हत्या व्हतो जवा तान्हा*
*दुस्काळात मायेच्या माजे आटला व्हता पान्हा*
*पिठामंदी पानी टाकून पाजत जाय*
*तवा मले पिठामंदी दिसती माझी माय*
*कन्या-काट्या येचायाला माय जाई रानी*
*पायात नसे वहान तिच्या फिरे अनवानी*
*काट्याकुट्यालाही तिचं नसे पाय तवा मले*
*काट्यामंदी दिसती माझी माय बाप माझा रोज*
*लावी मायच्या मागं टुमनं बास झालं शिक्षान*
*आता घेऊ दे हाती काम शिकुनश्यानं कुठं*
*मोठ्ठा मास्तर हुनार हायं तवा मले मास्तरमंदी*
*दिसतो माझी माय दारु पिऊन मायेले मारी जवा*
*माझा बाप थरथर कापे आन लागे तिले धाप*
*कसायाच्या दावनीला बांधली जशी गाय तवा*
*मले गायीमंदी दिसती माझी माय बोलता बोलता*
*येकदा तिच्या डोळा आलं पानी सांग म्हने राजा*
*तुझी कवा दिसंल रानी*
*भरल्या डोल्यान कवा पाहील दुधावरची साय*
*तवा मले सायीमंदी दिसती माझी माय*
*म्हनून म्हंतो आनंदानं भरावी तुझी वटी*
*पुना येकदा जलम घ्यावा तुजे पोटी*
*तुझ्या चरनी ठेवून माया धरावं तुझं पाय*
*तवा मले पायामंदी दिसती माझी माय*

ही कविता लिहिणारे कवी स्व. प्रा.स.ग. पायपोळ आज आपल्यात नाहीत. तासिका तत्वावर नौकरी करत असताना त्यांचं देहावसन झालं.त्यांची ही कविता टेलिव्हीजनवर कविवर्य नारायण सुर्वे यांच्या नावे नोंदवली गेली.नंतर खूप जनांनी तीच री ओढली. परंतू कवी प्रशांत मोरे यांनी या कवितेची दखल या पुर्वीच आपल्या 'आई' या आईवरील कवितांच्या संकलीत काव्यग्रंथात स.ग. पाचपोळांची नोंद केलेली आहे.आज ही कविता लोकप्रिय कवितांच्या यादीत अग्रभागी आहे ते यातील भावार्थानं.

तिफण
विठ्ठल वाघ

*काळ्या मातीत मातीत तिफन चालते*
*ईज थयथय नाचते ढग ढोल वाजवितो.*
*सदाशिव हाकारतो नंदी बैलाच्या जोडीला*
*संग पारवती चाले ओटी बांधून पोटाला*
*सरीवर सरी येती माती न्हाती धुती होते*
*कस्तुरीच्या सुवासानं भूल जिवाला पडते*
*भूल जिवाला पडते वाट राघूची पाहते*
*राघू तिफन हाकतो मैना वाटुली पाहते. झोळी झाडाला टांगून राबराबते माऊली*
*तिथं झोळीतल्या जिवा व्हते पारखी साऊली.*
*अभिषेकात घामाच्या आसं देवाचं पूजन पिकं हालती डोलती जनू करती भजन.*
*गव्हा जोंधळ्यात तवा सोनं चांदी लकाकते*
*जशी चांदी लकाकते कपाशी फुलते.*
*चालं ऊनपावसाचा पाठशिवणीचा खेळ*
*लोनी पायाला वाटती मऊ भिजली ढेकळं.*
*काळ्या ढेकळात डोळा हिरवं सपान पाहतो*
*डोळा सपान पाहते, काटा पायात रुततो.*
*काटा पायांत रुतता लाल रगात सांडतं*
*लाल रगात सांडतं हिरवं सपान फुलतं.*

या एका कवितेनं मराठी सिनेमा आणि मराठी कविता मराठी माणसाच्या काळजात घर करुन राहिली. विठ्ठल वाघ हा झाडा सारखा हिरवागार कवी बघता बघता मराठी माणसांचा लाडका कवी झाला.मराठी कवितेतून शेतकरी आणि शेतीचं दुःख या कवितेनं जगासमोर मांडलं.भाकरीची निर्मीती प्रक्रीया समजावून सांगीतली.शेतकरी बापाची प्रतिष्ठा वाढवली.आपल्या पहाडी आवाजात ही कविता विठ्ठल वाघांच्या तोंडून ऐकणं हा अजून वेगळ्या आनंदाची अनुभूती असते.

**सोनं**
**सुधाकर गायधनी**

**"मी चिंध्या पांघरुन सोनं विकायला बसलो**
**गिर्हाईक फिरता फिरेना**
**मी सोनं पांघरुन चिंध्या विकायला बसलो**
**गिर्हाईक सरता सरेना"**

ही छोटीशी कविता लिहिणारे कवी सुधाकर गायधन, अमरावती परिसरातले.या एकाच कवितेनं त्यांनी महाराष्ट्रातल्या तमाम सूत्रसंवादकांच्या गळ्यातलं ताईत होणं कमावलं.

**(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आणि इंग्रजी भाषा आणि साहित्याचे संशोधन मार्गदर्शक आहेत)**

# रसवंती व्यवसाय फायदेशीर!

आधुनिक केसरी

सध्या उन्हाळ्याचे दिवस चालू आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत हमखास माणसांचे पाय थंड पेयाकडे वळले जातात. ग्रामीण भागात रसवंतीगृह गजबजताना दिसत आहे. ऊसाच्या चरख्याचा घुंगराच्या आवाज या आवाजामुळे लोकांचे लक्ष वेधून घेतले जाते. त्यामुळे लोकांना सांगायची गरज पडत नाही. चांगले पैसे मिळवून देणारा रसवंती व्यवसाय फायदेशीर आहे. तरुणांनी या व्यवसायाकडे वळल्यास वर्षभर तालुका रोजगार मिळवून देणारा व्यवसाय आहे. पूर्वी दहा रुपयाला रस मिळायचा आता पंधरा रुपये झाला आहे. व्यवसाय कोणताही असो आपल्या कामाप्रती निष्ठा असायला हवी. यश निश्चित मिळते. फेब्रुवारी ते मे अशा उन्हाळ्याच्या दिवसात हा व्यवसाय करण्यास चांगला काळ आहे. साधारणपणे आपल्याकडे को-४१९,८६०३२हा ऊस रसवंतीसाठी चांगला आहे. ग्राहकांना आवश्यकतेनुसार उसाच्या रसात बर्फाचा वापर केला पाहिजे. ऊसाच्या रसात अननस, लिंबु,आले यांचा वापर केला तर ऊसाचा रस आणखी चवदार लागतो. साधारणपणे ऊसाचा रस जास्त वेळ ठेवु नये.शक्यतो ग्राहकांना ताजा रस देण्यावर भर दिला पाहिजे.ऊसाचा रस हा नाशवंत आहे.साधारण तापमानात २ तासांपेक्षा जास्त टिकू शकतो.फ्रीजमध्ये ठेवला तर ३ते४ तास राहु शकतो. जर रस हिरवा, पिवळसर असला तर त्यावर फेस असला तर तो ताजा समजावा. असा रस चवीला गोड लागतो आणि रंगाने काळपट, तपकिरी दिसला तर तो ताजा नाही असे समजावे. शक्यतो ताजा रस पिणे फायदेशीर आहे. ऊसाचा रस आरोग्यदायी आहे.आपल्या शरीराचे तापमान योग्य राखले जाते. चेहऱ्यावरील डाग दुर होतात. पाण्याची कमतरता भरून निघते. ऊसाच्या रसाने आपल्याला ऊर्जा मिळते.ऊन्हापासुन बचाव होतो.जे लोक उन्हाळ्यात प्रवास करतात.त्यांनी दिवसातुन २ते ३वेळा ऊसाचा रस घेतला पाहिजे. तोंडातील दुर्गंधीपासून मुक्ती मिळते. पित्ताचा त्रास असलेल्यांसाठी ऊसाचा रस अवश्य घेतला पाहिजे. थकवा दूर करण्यासाठी, पचनसंस्था वाढविण्यासाठी नेहमी ऊसाचा रस घेतला पाहिजे. खरोखर ऊसाच्या रसात आयुवेर्दिक गुणधर्म आहेत. रसवंती व्यवसाय हा फायदेशीर आहे. आजच्या तरूणांनी नोकरीच्या मागे न लागता स्वताचा व्यवसाय करावा. व्यवसायाकडे वळल्यास हमखास पैसा मिळू शकते.फक्छ इच्छाशक्ती असली पाहिजे.


**संतोष दत्तू शिंदे**
**मु.पो. काष्टी, ता. श्रीगोंदा, जिल्हा. अहमदनगर**
**महाराष्ट्र, मो.७७२१०४५८४५**







# बीजसंस्कार...



1. ऋतू म्हणजे नवनिर्मितीचा पाया...
ध्रुवं चतुर्णाम् सानिध्यात् गर्भः स्यात् विधिपूर्वकम्|
ऋतू- क्षेत्र - अंबु -बीजानाम् सामग्र्यात् अंकुरो यथा
|| सु. शा. २/३३

आयुर्वेदीय गर्भसंस्कार या आपल्या सिरीज मध्ये आज आपण ऋतू, क्षेत्र, अंबू आणि बीज या गर्भसंभव सामग्री म्हणजेच गर्भ निर्मितीसाठी आवश्यक असणारे घटक याबद्दल पुढे चर्चा करणार आहोत. गर्भनिर्मितीसाठी महत्त्वाचा पाया म्हणजे ऋतुकाल. या लेखामध्ये आपण ऋतुकाला बद्दल ( Ovulation ) विशेष माहिती घेऊयात. ज्याप्रमाणे निसर्गामध्ये ऋतू बदलतात आणि नवनिर्मितीची प्रक्रिया घडत राहते. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या विशिष्ट ऋतूमध्ये निसर्गामध्ये होणारे बदल आपल्यास दिसून येतात. पिंडी ते ब्रह्माण्डी या न्यायानुसार जे काही पृथ्वीतलावर / विश्वात आहे तेच आपल्या शरीरात देखील अस्तित्वात आहे, धरणी माता ज्या अर्थाने आपण या पृथ्वीला मातेचे संबोधन देतो आणि पुनर्निर्मितीची प्रक्रिया पाहतो. हेच वरदान समस्त स्त्री जातीला प्राप्त झालेले आहे, त्यामुळेच आपण आईला माता असे म्हणतो. ज्याप्रमाणे बीज रोवण्यासाठी ऋतुकाल गरजेचा असतो म्हणजेच पावसाळा सुरू झाल्यानंतर आपण वेगवेगळी झाडे लावण्यास सुरुवात करतो, कारण तो काळ बीज रुजवण्यासाठी अति उत्तम असतो, याचप्रमाणे ऋतुकालात स्त्रीच्या शरीरात देखील विशिष्ट बदल घडून येतात. ऋतुकाल म्हणजेच Ovulation चा काल. हा काळ स्त्री आणि पुरुष बीजाच्या मिलनासाठीचा योग्य काळ असतो आणि याच काळात बीजापासून अंकुर बनण्यास प्रारंभ होतो.

मासिक पाळी नंतरचा चौथा ते सोळावा दिवस म्हणजे गर्भाधान काल यालाच ऋतुकाल असे म्हणतात, या काळात गर्भ राहण्यासाठी उपयुक्त असे वातावरण स्त्रीच्या गर्भाशयामध्ये निर्माण होते.

आयुर्वेदिक गर्भसंस्काराचा अभ्यास करताना ह्या ऋतुकाला बद्दल स्त्रीला विशेष माहिती असणे गरजेचे असते. बऱ्याच मुलींना हा काल माहिती नसतो. पाळीच्या चौथ्या दिवसापासून ते सोळाव्या दिवसापर्यंत जर स्त्री आणि पुरुष यांचे संबंध आले तर गर्भधारणा राहण्यासाठी उत्तमकाळ मानला जातो,




याच काळात स्त्रीचे हार्मोनल इम्बॅलन्स देखील होताना दिसते त्यामुळे स्त्रीच्या शारीरिक आणि मानसिक स्थितीकडे या काळात विशेष लक्ष देणे गरजेचे ठरते. याबरोबरच फिमेल रिप्रोडक्टिव्ह सिस्टीम चे ज्ञानही जर त्या स्त्रीला असेल तर गर्भधारणा लवकर राहण्यासही मदत होते, एखादी गोष्ट आपल्याला आधीपासून माहिती असल्यास किंवा जी गोष्ट आपल्याला हवी आहे त्या गोष्टीचे ज्ञान अवगत करून मेडिटेशन केल्यास विचारशक्तीला चालना मिळते आणि ती घटना आपल्या आयुष्यात लवकर घडते, यासाठी नैसर्गिक गर्भधारणा राहण्यासाठी योग्य ऋतूमध्ये आपण स्त्रीला त्या पद्धतीच्या सूचना देतो जेणेकरून तिला गर्भधारणा राहण्यासाठी मदत होईल. शहरी भागातल्या मुलींना किंवा शिकलेल्या मुलींना,6 सायन्स फील्ड असलेल्या मुलींना ह्या गोष्टीची कल्पना असते परंतु ज्या मुली ग्रामीण भागातून आलेल्या आहेत त्या मुलींना या गोष्टीची तसूभरही कल्पना नसते, हा अभ्यास करताना एक गोष्ट लक्षात ठेवणे तेवढेच गरजेचे आहे की आपण विचार करून बाळ जन्मत नाही किंवा बाळ आपण बाळाला निवडत नाहीत तर बाळ आपल्याला निवडत असते म्हणजेच आपल्या गर्भाशयातील वातावरण आपल्या बिजांची गुणवत्ता पाहून बाळ आपल्या उदरात प्रवेशित होते. मग उत्तम अशा संतती प्राप्तीसाठी आपल्याला योग्य विचारांची जोड असणे म्हणजेच मनोवांछीत संतती प्राप्त करणे. पुढच्या भागात आपण हे बीज ज्या ठिकाणी रुजते म्हणजेच गर्भाशय, त्याबद्दल विशेष माहिती घेणार आहोत...



**डॉ. मंगल सुरेश ताठे**
**[एम. डी . आयुर्वेद]**
**मोबाईल - 9168101060**
**शारदा क्लिनिक संचलित शाश्वत आयुर्वेद व गर्भसंस्कार चिकित्सालय,**
**पिसादेवी, छत्रपती संभाजीनगर**
**फाउंडर - स्त्री वैद्या संचलित आयु पंख संघटना**

# अर्तवक्षय(रजक्षय) व आयुर्वेद



अर्तवक्षय अथवा रजक्षय याचा अर्थ मासिक पाळी उशिरा येणे, मासिक पाळीच्या वेळेस कमी प्रमाणात अंगावर जाणे, किंवा कमी दिवस अंगावर जाणे, असे वर्णन सुश्रुत संहिता मध्ये आढळते.

पाळी न येणे ही अवस्था बाल्या अवस्था ( रजो दर्शनापूर्वी ), वृद्ध वस्ता ( रजोनिवृत्तीनंतर ), गर्भिणी अवस्था ( गरोदरपणी ) व सुतिका अवस्था ( बाळंतीण झाल्यानंतर काही दिवस ) या काळात शरीरक्रिया नुसार प्राकृतिक अवस्था असते. या अवस्था व्यतिरिक्त जेव्हा पाळी उशिरा येते अंगावर कमी जाते ,किंवा कमी दिवस जाते तेव्हा असे का होते याचा विचार आपण करू.

रजशयाचे स्वरूप स्वातंत्र, म्हणजेच स्थानिक गर्भ संस्थेशी संबंधित किंवा परतंत्र म्हणजेच इतर शारीरिक आजारामुळे निर्माण झालेले असू शकते.

दैनंदिन जीवनात खाणे पिणे, व्यायाम, मानसिक ताणतणाव यासारख्या गोष्टीचा परिणाम रजाच्या निर्मितीवर( मासिक पाळीच्या वेळेस होणाऱ्या स्त्रावर ) कशाप्रकारे होतो हे आपण पाहू.

*असत्म्या अन्नः काही व्यक्तींना विशिष्ट तहेच अन्नपदार्थ खाल्ले, की पोट दुखणे ,डोके दुखणे, जुलाब होणे इत्यादी स्वरूपाचा त्रास नेहमीच होतो. काहींना अंडे खाल्ले की त्रास होतो काहींना ताक घेतलेकी त्रास होतो, चण्याच्या डाळीचे पदार्थ, वांगे , कोणत्याही पदार्थाचा एखाद्या व्यक्तीला त्रास होऊ शकतो. ते विशिष्ट प्रकारचे अन्नपदार्थ त्या विशिष्ट व्यक्तीला असात्मय आहे असे म्हणता येते. अनशन : पौष्टिक आहार न घेणे किंवा कमी खाणे, न खाणे. अति संशोधन, अति शमन : वमन, विरेचर इत्यादी चिकित्सा किंवा पोटातून दिली जाणारी औषध चिकित्सा अधिक प्रमाणात केली जाणे. वरील गोष्टी वरचेवर केल्या गेल्याने मुख्यत्: धातुशय होतो. रस, रक्त धातूची निर्मिती योग्य तऱ्हेने होत नाही. अर्थातच त्याचा परिणाम म्हणून रजाची निर्मिती कमी प्रमाणात होते. कारण, रजस्त्राव म्हणजेच रसधातूपासून तयार होणारे रक्तस्वरूप रज असते. रजस्त्रावाशी संबंधित पुढील गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे.

- वेग धारणः मलमूत्राशी, संवेदना झाल्यावर वरचेवर त्याचा आवरोध करणे.
-व्यायामः चुकीच्या पद्धतीने किंवा अति प्रमाणात व्यायाम करणे.

अशा प्रकारच्या कारणामुळे वाढदिवसाचे संतुलन बिघडते. स्त्री प्रजनन संस्थेवर प्रामुख्याने वातदोषाचे नियंत्रण असते. वातदोषाबरोबर कफदोषातील असंतुलन सुद्धा रजशयाला कारणीभूत असते. या दोन्ही दोषातील असंतुलनामुळे रजस्त्राव व्यवस्थित होत नाही. मानसिक तणावामुळे रजक्षय संभवतो. मानसिक तणावामुळे रस धातूची निर्मिती व त्यामुळे रजाची निर्मिती योग्य तऱ्हेने होत नाही. तसेच स्वतःच्या कार्यातही बिघाड होतो. म्हणजेच, काही वेळेला रजाची निर्मिती योग्य प्रमाणात न होणे, तर काही वेळा दोषांमधील असंतुलनामुळे रजस्त्राव योग्य प्रकारे न होणे, असे रजक्षया चे स्वरूप असू शकते.

रक्तगुलम नावाचा स्वतंत्र आजार आयुर्वेदात दिलेला आहे. गर्भाशया मध्ये वाढणारी गाठ असते. त्यामुळे पाळी उशिरा येते. पांडू ( ॲनिमिया ), राजयक्ष्मा( ट्यूबर्क्युलोसिस ), ग्रहणी ( पचन संस्थेचा जुनाट आजार ) या आजारामध्ये रजशय उपद्रव स्वरूप आढळतो. म्हणजेच या मूळ आजाराचा परिणाम म्हणून रजशय निर्माण होतो.

काही रुग्णांमध्ये शरीरात फार मेद वाढल्याने रजशय होतो. मेदाची वाढ जास्त प्रमाणात होत असते व रस धातूचे पोषण अवश्य स्वरूपात होत नसते. परिणामी रजाचे प्रमाण कमी होते.

आयुर्वेदानुसार चिकित्सा ची विभागणी मुख्यत्वः तीन भागांमध्ये करता येते.

१ ) संशोधनः यामध्ये पंचकर्मातील चिकित्सा पद्धतीचा वापर केला जातो. वातदोषावर नियंत्रण राखण्यासाठी बस्ती चिकित्सा उपयुक्त ठरते. यामध्ये गोदावटे औषधी काढतील याचा वापर केला जातो. पचन संस्थेतील विकारामुळे रसधातूवर परिणाम होऊन रजाची निर्मिती व्यवस्थित होत नसल्यास रुग्णाच्या अवस्थेनुसार काही वेळा वमन, विरेचन चिकित्सा ही उपयुक्त ठरते. व मनामध्ये उलटी वाटे तरी चना मध्ये जुलाबा वाटे शरीरातील असंतुलित दोष बाहेर काढले जातात. उत्तर बस्तीचा फार चांगला उपयोग रज क्षय च्या चिकित्सेत होतो. २ ) शमन चिकित्सा-ही औषधी वात व कफ दोषाच्या विरोधी गुणाची असल्याने त्यामध्ये संतुलन साधण्यास मदत होते. त्याचप्रमाणे पचन संस्थेतील दोष दूर होऊन रसधातूची निर्मिती चांगल्या प्रकारे होते .या सर्वांमुळे रजाची निर्मिती देखील योग्य प्रकारे होऊ लागते.




रसधातू मधील अथवा रक्त धातू मधील कमतरतेमुळे रजाचे प्रमाण कमी असल्यास रसरक्ताची वाढ योग्य प्रकारे करणारी औषधी वापरली जातात .तसेच गर्भाशय व संबंधित अवयवाचे बल वाढविणाऱ्या औषधाचा वापर केला जातो.

रजक्षयाला कारणीभूत असणाऱ्या गोष्टी टाळणे हा ही चिकित्साचाच एक भाग आहे.

उदाः वेग धारण न करणे, आहारातील पत्ता पथ्याचा विचार करून योग्य आहार घेणे, योग्य व्यायाम करणे इ.

पांडु, रक्तगुल्मा अशा आजारामुळे रजक्षय झालेला असेल तर त्या आजारावर योग्य उपचार करणे निश्चितच आवश्यक असते.

Dr Suchita Savle
B.A.M.S. DYN & M.A.( Yoga )
( Infertility, prenatal yoga and Garbhsanskar Consultant )
Contact No. 84858 03490



# संधिवात.... आयुर्वेद... पंचकर्म



संधी म्हणजे जॉईंट आणि वात म्हणजे हा त्रिदोशा पैकी ऐक महत्वाचा दोष.हा वात दोष जेव्हा सांध्यांच्याठीकानी येतो तेव्हा अनेक वातव्याधी निर्माण करतो.त्यातलाच एक

उदा..1.संधिवात 2.आमवात ( Rhumatoid arthritis ) 3.गाउट-या मधे uric acid वाढलेले दिसते चुकीचे आहार विहार, वाढतं वय, वयोमानानुसार शरीराची झीज, प्रामुख्याने वृध्दांना होणारा आजार आहे. महिलांना जास्त प्रमाणात संधिवात होतो. आजकाल लहान मुले ( किशोरवयीन ) व युवकांनाही हा आजार होताना दिसतात . संधीवात झालेल्यांना सांध्यांमध्ये सातत्याने तीव्र वेदना जाणवतात,सांध्यांमध्ये ताठरता, सूज संध्याचा जवळचा भाग लाल होतो, चालण्या फिरण्यास, हालचाल करण्यास अडथडा येणे. बऱ्याच लोकांना नियमित बारीक ताप येणे, हातांच्या व पायांच्या बोटांमध्ये सूज येणे व मर्यादित हालचाल होणे. असे लक्षण दिसतात. आयुर्वेदामध्ये संधिवात ..वात .. दोषांची विशेष चिकित्सा सांगितली आहे. आयुर्वेदानुसार चिकित्सेचे दोन भाग होतात.

१: धातुक्षयजन्य संधिवात २: मर्गावरोधकण्या मार्गवरोधजन्य संधिवात. धातुक्षयज जन्य मधे सांध्यांमधील हाडाची झीज होते, कट कट आवाज होतो,उठता बसताना वेदना होतात .

ह्यामध्ये झीज भरून काढणारे औषध देणे आवश्यक ते पंचकर्म करणे.

ह्यामध्ये साधारणतः अश्वगंधा, शतावरी, सुवर्ण योग. आदि सारखी बल्य औषधींचा वापर करणे .

मार्गावरोध जन्य संधिवात :

ह्या मधे अवरोध दूर करणे चिकित्सा केली जाते. अवरोध का होतो ,सूज का येते , सांधा का जकडतो ह्यांची दिपन पाचान औषधी देऊन चिकित्सा करतात पंचकर्म व औषधींनी ( दिपन पाचन ) संधिवातावर व इतर वत्व्याधी वर मात करता येते किंवा संधिवात होऊ नये म्हणून दिनचर्या आहार विहाराचे पालन करून सुरुवातीलाच व्याधी होऊ नये ह्याची काळजी घेतली जाते. पंचकर्म मधे प्रथम औषधीयुक्त तेलाने सर्वांग अभ्यंग ( मसाज ) करतात व नंतर औषधी युक्त द्रव्यांच्या kadhyachi वाफ देऊन अवशकते नुसार पंचकर्म करतात . जसेःबस्ती,विरेचन, रक्तमोक्षण, वमन, नस्य पोटली स्वेद,असे बरेच पंचकर्म आयुर्वेदात वर्णन केले आहेत. बस्ती : बस्ती दोन प्रकारची वापरतात . औषधी युक्त द्रव्यांचा काढा करून देण्यात येणारी बस्ती ही निरुह बस्ती व औषधी युक्त तेलाचा वापर करून जी बस्ती दिली जाते ती अनुवासन बस्ती

**रक्तमोक्षण :** सांध्यामध्ये ठस ठस होत असेल तर सांध्याच्या जवळच्या नसेतून किंवा सिरेतून सिरवेध करून काही प्रमाणात दूषित रक्त काढले जाते. ह्या क्रियेने लगेचच वेदना कमी होतात

**पिंडस्वेद :** औषधी वनस्पतीने दूध सिद्ध करून त्यात विशेष प्रकारचे तांदूळ शिजवून त्याची पोत्तली बांधून औषधी वनस्पती सिद्ध दुधामध्ये भिजून शेक देणे. हा क्षयजन्य संधिवातमधे फार उपयोगी आहे ( सांध्याची झीज भरून निघते ) असे योग्य त्या पंचकर्म उपयोग करून संधिवात होणार नाही व झाल्यास सुरुवातीलाच त्याला आळा बसवणे, त्याला कंट्रोलमधे ठेवणे , वेदने पासून मुक्त ठेवणे हे सर्व आपल्याला पेनकिलर शिवाय आयुर्वेदाच्या साह्याने ( पंचकर्म ) करता येते.

**डॉ. सुनीता विशाल परिहार**
**बी ए यम यस (आयुर्वेदाचार्य)**



**पंचकर्म व स्त्रीरोग चिकीत्सक**
**9422925192**
**परिहार क्लिनिक आयुषवर्धन आयुर्वेद व पंचकर्म**
**सातारा पोलीस स्टेशनच्या बाजूला , आमदार रोड, सातारा परिसर**

# २६२२ वा भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव भव्य प्रमाणात साजरा होणार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात दिनांक २४ मार्च ते २ एप्रिल पर्यंत विविध कार्यकमाचे आयोजन करुन हा महावीर जन्मोत्सव साजरा करण्यात येत आहे त्या करीता सकल जैन समाजाचे अध्यक्ष मा. ना. राजेंद्रबाबुजी दर्डा व कार्याध्यक्ष आ. सुभाष झांबड,महासचिव महावीर पाटणी, कोषाध्यक्ष जी.एम. बोथरा, उपाध्यक्ष ललीत पाटणी, झुंबरलाल मिठालाल पगारीया, सुधीर साहुजी, अनिलकुमार संचेती, कौशीक सुराणा, दिगंबर क्षिरसागर, रतिलाल मुगदिया, कांकरिया, विकास जैन प्रशात देसरडा, डी. बी. कासलीवाल, डॉ. प्रकाश झांबड, विलास साहुजी, संजय संचेती, रवि मुगदिया, जिनदास मोगले, मदनलाल आच्छा, विनोद बोकडिया, वृषभ कासलीवाल, मुकेश साहुजी, निलेश सावलकर, भारती बागरेचा, करुणा साहुजी, भावना सेठीया, मंगला पारख यांच्या मार्गदर्शनाखाली जन्मोत्सव समितीची स्थापना करण्यात आली असुन त्याच्या अध्यक्ष स्थानी राजेश मुथा कार्याध्यक्ष निलेश पहाडे, कविता अजमेरा, महासचिव रवि लोढा, मेघा सुगंधी, कोषाध्यक्ष राहुल साहुजी, मिठलाल कांकरिया, संगीता संचेती, कार्यक्रम संयोजक अजित चंडालिया, पल्लवी शहा, माया मुथा, पुष्पा बाफना, सहसचिव अमोल मोगले, तनुजा गांधी, मिना पापडीवाल, मंजु पाटणी, नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल आदी समिती कार्य करीत आहे.



दिनांक २४ मार्च ते ०२ एप्रिल पर्यंत विविध प्रभागात चिकीत्सा शिबीर, जैन अलर्ट ग्रुपच्या वतीने शासकीय वैदयकीय महाविदयाल ( घाटी ) येथे अन्नदान तसेच भ. महावीर जन्मकल्याण महोत्सव समितीच्या वतीनेही विविध भागात अन्नदानाचा कार्यक्रम मोठया उत्साहाने संपन्न होत आहे. दिनांक ४ एप्रिलरोजी सकाळी राजाबाजार जैन मंदिर, महावीर भवन, दक्षिण मध्य, 1 विमलनाथ जैन मंदिर, जैन मंदिर एन ३ पंढरपुर संघ, वाहन मुख्य रॅली निघणार असुन शहरातील विविध भागातुन विविध वाहन रॅली महावीर स्तंभ येथे सकाळी ७ वाजता पोहचणार आहे व तेथे सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्रबाबुजी दर्डा यांच्या शुभहस्ते धर्म ध्वजारोहन होणार आहे. कार्याध्यक्ष आ. सुभाष झांबड व जन्मकल्याणक समितीचे अध्यक्ष राजेश मुथा, कार्याध्यक्ष निलेश पहाडे, महासचिव रवि लोढा, कोषाध्यक्ष राहुल साहुजी, कार्यक्रम संयोजक अजित चंडालिया, सचिव अमोल मोगले यांच्यासह सर्व पदाधिका-यांची या ठिकाणी उपस्थिती राहणार आहे.

सकाळी ७.३० वाजता श्री. उत्तमचंद ठोले दिगंबर जैन छात्रालय उस्मानपुरा व गुरुगणेशनगर येथे हि धर्मध्वजारोहन होईल. मुख्य मिरवणुकीस सकाळी ८ वाजता आचार्य महाप्रज्ञजी यांचे शिष मुनिश्री डॉ. पुलकीतसागरजी महाराज, आदित्यकुमारजी ठाणा २, आचार्य रविनंद महाराज, मुनिश्री प्रभावसागरजी महाराज, मुनिश्री प्रभातसागरजी महाराज, स्वाध्वी आर्केन्दु श्रीजी मसा, आर्यिका कुलभुषणमती माताजी, स्वाध्वीश्री कुसुमप्रभाश्रीजी मसा, अरुणप्रभाश्रीजी मसा ठाणा - २, साध्वीश्रीजी मसा डॉ. कुमुदलताजी मसा,प.पु. डॉ. महाप्रज्ञाश्रीजी मसा,प.पु.डॉ.पदमकिर्तीजी मसा, प. पु. राजकिर्तीजी ठाणा ४ आदींच्या मंगल सानिध्यात पैठण गेट शोभायात्रेस प्रारंभ होणार आहे. पुरुष वर्गाकरिता पांढरे शुभ्र वस्त्र व महिलांसाठी गुलाबी, लाल, केसरी, वस्त्रे परिधान करून हजारोंच्या संख्येने महावीर भक्ताने उपस्थित रहावे असे आवाहन जन्मोउत्सव समितीचे अध्यक्ष राजेश मुथा, कार्याध्यक्ष निलेश पहाडे, महासचिव रवि लोढा, कोषाध्यक्ष राहुल साहुजी, कार्यक्रम संयोजक अजित चंडालिया, सचिव अमोल मोगले, कविता अजमेरा, मनिषा भंसाली, ललीता साकला, कमलाबाई ओस्तवाल, मिना पापडीवाल, करुणा साहुजी, भारती बागरेचा, मंगला पारख, प्रचार प्रसार संयोजक नरेद्र अजमेरा व पियुष कासलीवाल आदींनी केले आहे. या शोभायात्रेत शंखेश्वर पार्श्वनाथ जैन जिनालय सिडको एन-३ रथ, श्री. पार्श्वनाथ खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर राजाबजार पालखी, श्री. अग्रवाल दिगंबर जैन मंदिर सराफा श्री. सैतवाल दिगंबर जैन मंदिर भाजीबाजार येथुन भव्य पालखी तसेच श्री आनंदजी कल्याणजी ट्रस्ट चे श्री गोडीजी पार्श्वनाथ जैन श्वेतांबर मंदिर जोहरीवाडा येथुन रथ व औरंगाबाद जैन श्वेतांबर मुर्तीपुजक संघ रथ यात्रेत सामील होतील. दिनांक २ एप्रिल रोजी चंद्रसागर जैन धर्मशाळा येथे भगवान महावीर व्याख्यान माला सकाळी ९ ते १०.३०, दिनांक ४ एप्रिल रोजी महावीर मेडीकल फाऊंडेशनच्या वतीने सरस्वती भवन प्रांगण येथे महारक्तदान शिबीराचे आयोजन केले आहे प्रकल्प प्रमुख डॉ. प्रकाश पाटणी, डॉ. प्रकाश झांबड हे आहे. तसेच चंद्रसागर धर्मशाळा येथे ७ ते १० भक्तीसंध्या आयोजीत केली आहे. तसेच संगीनी ग्रुप तर्फे थैलीस्मिया ब्लड डोनेशन शिबीराचे आयोजन केले आहे. तसेच एच पी वेलनेस स्टुडीओच्या माध्यमाने हेल्थ चेकअप आयोजीत केला आहे.

रथ यात्रा महामार्गावर स्वच्छता व्यवस्थेसाठी श्री. वर्धमान नागरी सहकारी संस्थेचे सहकार्य मिळाले आहे. भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव निमीत्त नवकार फेडरेशन नवकार महिला व नवकार फाऊंडेशनचे शहराच्या विविध भागात प्रदर्शनी लावण्यात आली आहे. महोत्सवाच्या संपर्क कार्यालय विमलनाथ जैन मंदिर जाधवमंडी असुन प्रचार साहित्य अशोक रुणवाल हे वितरीत करीत आहे. यावर्षी प्राऊड ऑफ जैन या विषयावर विविध संस्था व्दारा झॉकीया रॅलीमध्ये राहणार आहे. तरी सकल जैन समाजाच्या सर्व समाज बांधवांनी मोठया संख्येने कार्यकमाचा लाभ घ्यावा असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राजेश मुथा अध्यक्ष मो. ९४२३३९४४३१, रवि लोढा महासचिव, निलेश पहाडे कार्याध्यक्ष, राहुल साहुजी कोषाध्यक्ष हे विशेष मेहनत घेत आहेत.

## औशात खासदार आमदारांमध्ये रस्ते विकास कामांसाठी निधी मंजुरीवरून श्रेयवाद रंगला

### आमच्या नेत्याने निधी आणला सांगण्यात कार्यकर्ते जोमात

आधुनिक केसरी न्यूज

**औसा :** मतदारसंघातील अनेक गावच्या रस्ते कामासाठी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत ग्रामविकास मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री गिरीष महाजन यांच्या कडे निधीची मागणी मीच केली. माझ्या मागणीवरून त्यांनी निधी मंजूर केला. असा श्रेयवाद औशात सुरू असून यावरून सोशल मिडीयावर विद्यामान शिवसेना ( उध्दव बाळासाहेब ठाकरे ) गटांचे खासदार ओमराजे निंबाळकर व औशाचे आमदार अभिमान्यू पवार यांच्यात चांगलाच श्रेयवाद रंगला असून कार्यकर्ते आमच्याच नेत्याने निधी मंजूर करून आणल्यांचा पोस्ट दोन्ही गटांचे कार्यकर्ते करत असून जनता मात्र कोणी रस्ता होणार यामुळे आनंदी असून कोणी पण आणला तरी दोन्ही लोकप्रतिनीधी आहेत मतदार संघांचा विकास करणे त्यांचे कर्तव्य आहे. परंतु प्रत्यक्षात ज्यांनी निधी आणला हे त्यांना माहित असल्याचे बोलले जात आहे. सदरील निधी हा राज्य महामार्ग ५२ ते याकतपूर - करजगाव -राज्य महामार्ग २३९ - फत्तेपूर - राज्य महामार्ग २४२ रस्ता व पुलाचे काम करणे, नागरसोगा ते दावतपूर रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, कासार सिरसी ते सिरसी वाडी, जुने नांदुर्गा ते जुने गुबाळ, केंगलवाडी जोडरस्ता, आलमला ते आलमला तांडा, राष्ट्रीय महामार्ग ते कवठ ला ते सरहद्द बिंदगीहाळ, आनंदवाडी जोडरस्ता, जुने सारणी ते नवीन सारणी, गाढवेवाडी गाढवेवाडी तांडा, राज्य महामार्ग २४२ ते जुने गुबाळ, लिंबाला ते बसवेश्वर मंदिर भूतमुगळी, उजनी ते कमालपूर व कासार बालकुंदा ते राज्य महामार्ग २३७ या रस्त्यांचे डांबरीकरण काम करणे राज्य महामार्ग २३८ ते नांदुर्गा तांडा, इजिमा १०४ ते लमान तांडा, प्राजीम ५३ ते बाणेगाव आणि नांदुर्गा ते गुबाळ या रस्त्यांवरील पुलांचे व जोडरस्त्यांचे काम करणे तसेच सारोळा ते खुंटेगाव व सांगवी ते सांगवीवाडी रस्त्यांची सुधारणा करणे इत्यादी कामांसाठी 8कोटी 17 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून माझ्या मागणीवरून व सतत पाठपुरावा करून निधी मंजुर केल्यांची पोस्ट सोशल मिडीयावर खासदार ओमराजे निबाळकर व आमदार अभिमान्यू पवार यांचे कार्यकर्ते करत असुन सोशल मिडीयावर खा.ओमराजे निंबाळकर यांनी मागणी केलेले पत्र सर्वत्र व्हायरल होत आहे. यावरून दोन्ही लोकप्रतिनिधी मध्ये सोशल मिडीयावर निधीवरून श्रेयवाद रंगल्याचे दिसून येत आहे. असो परंतु निधी कोणी ही आणला तरी या निधीमुळे सिरसी वाडी सारख्या रस्ताच नसलेल्या गावांना तसेच विकासापासून वंचित राहिलेल्या अनेक तांड्यांनाही आता रस्ता उपलब्ध होणार आहे.त्यामुळे तेथील नागरिक आंनदी झाले असून आता त्यांची रस्ता ची समस्या मिटणार असल्यांचे समाधान त्यांच्याकडून व्यक्त होत असून लातूरचे पालकमंत्री मा श्री गिरीशजी महाजन यांचे मनःपूर्वक आभार निधी दिल्याबद्दल आभार मानले जात आहेत.



## कोरोनात मृत्यू पावलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वारसास ५० लाखांची मदत

आधुनिक केसरी न्यूज

**संतोष वाघमारे**

**टेंभुर्णी :** पालवण ता.माढा ग्रामपंचायतीचे कंत्राटी कर्मचारी, डाटा एन्ट्री ऑपरेटर प्रशांत ओहोळ याचा कोरोना काळात कर्तव्य बजावत असताना मृत्यू झाला होता. त्याचे कुटुंबास राज्यातील पहिली ५० लाख रूपयाची मदत शासनाने मंजुर केली आहे. त्याचा वाटप जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांचे हस्ते मयताची माता आशा ओहाळ व पिता परमेश्वर ओहाळ यांना मंजुरीचा आदेश प्रदान करणेत आला. यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघाने या साठी विशेष प्रयत्न केले आहेत. राज्यात कंत्राटी कर्मचारी यांना देण्यात आलेली ही पहिली मदत आहे. शुक्रवारी जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात मदतीचा आदेश सिईओ दिलीप स्वामी यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, राज्य ग्रामसेवक संघाचे राज्याध्यक्ष तात्यासाहेब पाटील, सोलापूर जिल्हा ग्रामसेवक संघाची पतसंस्थेचे चेअरमन रामभाऊ मिटकल, पालवण ग्रामपंचायतीचे अतुल क्षीरसागर, माजी सरपंच परमेश्वर पाटील, आई आशा ओहोळ, वडिल परमेश्वर ओहोळ, भाऊ तेजस ओहोळ, महाराष्ट्र कंत्राटी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सचिन जाधव, प्रशासन अधिकारी जहीर शेख, आपले सरकार सेवा केंद्रांचे महावीर काळे उपस्थित होते.

ग्रामपंचायत विभागाचे प्रशासन अधिकारी जहीर शेख, आपले सरकार चे जिल्हा व्यवस्थापक महावीर काळे यांनी प्रस्ताव पाठविणे साठी प्रयत्न केले.

**महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघाच्या प्रयत्नाला यश**

कोरोना कालावधीत मयत झालेल्या कर्मचारी बांधवांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान मिळावे यासाठी मागील दीड वर्षापासून महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघाच्या वतीने कोरोना कालावधीत मयत झालेल्या बांधवांच्या प्रस्तावा बाबत ग्रामविकास व वित्त विभागाकडे पाठपुरावा केला जात होता .त्यामुळे प्रशांत ओहोळ यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळाल्याचे ग्रामसेवक संघाचे राज्याध्यक्ष तात्यासाहेब पाटिल यांनी सांगितले . **- तात्यासाहेब पाटील**

**कंत्राटी कर्मचारी यांना मदतीचा हात**

कोरोना काळात कंत्राटी कर्मचारी यांनी मोठ्या प्रमाणावर कामे केली . काम करीत असताना मृत्यु पावलेले प्रशांत ओहोळ हे पहिले कंत्राटी कर्मचारी आहेत . त्यांना ५० लक्ष रूपयाची मदत करण्यात येत आहेत असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले . **- दिलीप स्वामी**



## नायब तहसीलदार वर्ग -२ ग्रेड पे बाबत बेमुदत ठिय्या आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** नायब तहसीलदार या पदाचे वेतन राजपत्रित वर्ग -२ चे नसल्याने महाराष्ट्र राज्य तहसिलदार व नायब तहसिलदार संघटना यांनी नायब तहसिलदार यांचे ग्रेड पे वाढविण्याबाबत सन १९९८ पासून आजपर्यंत शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुनही संघटनेच्या मागणीचा कोणताही विचार करण्यात आलेला नाही आंदोलन करण्यात आला . तसेच या संदर्भात कोणतीही माहिती शासन स्तरावरून अदयापही देण्यात आलेली नाही. संघटनेचे नायब तहसिलदार राजपत्रित वर्ग २ यांचे ग्रेड ४८०० / - रु .करण्याचे अनुषंगाने शासनाला या आधीही बेमुदत बंदची नोटीस दिली होती . परंतू महसूल प्रशासन महाराष्ट्र शासन यांनी या संदर्भात कुठलीही दखल घेतलेली नाही. तत्कालीन अपर मुख्य सचिव व महसूल मंत्री व वित्तमंत्री यांचेसह झालेल्या बैठकीत विषय मार्गी लागण्याचे आश्वासन दिले होते तथापी त्याची कोणतीही अंमलबजावणी न झाल्याने तसेच के.पी. बक्षी यांचे अध्यक्षतेखालील वेतन टी समिती समक्ष नामव तहसिलदार यांचे ग्रेड पे ४८०० / - वाढविण्याबाबत सादरीकरण करूनही तसेच पे कामाचे स्वरूप याची सर्व माहिती असूनही वारंवार देवूनही संघटनेच्या मागणीचा कोणताही विचार करण्यात आलेला असे सांगण्यात सांगण्यात आले . अधिक काम अधिक वेतन या नेखक म्याप तत्वाने व शासनाच्या धोरणानुसार सदर मागणी ही अतिशय शस्त व व्याख्य असूनही याबाबत शासन स्तरावरून व विशेषतः महसूल विभागाकडून नायब तहसिलदार मांचे वेतन श्रेणीत न्याय मिळाला नाही . त्यामुळे तहसिलदार नायब तहसिलदारांमध्ये तिव्र असंतोष निर्माण झाला आहे असे या ठिकाणी त्यांची भावना व्यक्त करण्यात आली. जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरू राहील असे सांगण्यात आले.

## आष्टी पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर

### अध्यक्षपदी जमीनदार सचिवपदी बाबासाहेब बागल

आधुनिक केसरी न्यूज





**परतूर :** तालुक्यातील आष्टी येथे दि.1 शनिवार रोजी मोरंगेश्वर कार्यालयात पत्रकार यांची बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी कार्यकारणी संदर्भात सर्वानुमते चर्चा करून अध्यक्षपदी अजीज जमीनदार सचिवपदी बाबासाहेब बागल, सहसचिवयांची निवड करण्यात आली.

उपाध्यक्ष म्हणुन अंगद मुंढे, राहुल आवटे सहसचिव लक्ष्मी तांबडे, कोषाध्यक्ष पदी राजेश नायक,कार्याध्यक्ष माऊली सोळंके, संघटक म्हणून दीपक भदर्गे, सहसंघटक अर्जुन थोरात, मार्गदर्शक प्रा. जगन्नाथ रासवे यांची निवड करण्यात आली. यावेळी पत्रकार अर्जुन थोरात, मंगेश बिजोले, बाबासाहेब बागल, उमेश राजमाने, उमेश वैद्य,मुनीर शेख, गौतम शेळके, आरेफ कल्याणकर,सोपान वाघमारे,लक्ष्मी तांबडे, इरफान कुरेशी, यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. उपस्थित सर्वांनी निवड झालेल्या पदाधिकारी यांचे अभिनंदन करुण पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# दिल्लीत होत असलेल्या जंतर-मंतर उपोषणाला पाठिंबा

## पेन्शन व इतर मागण्यांसाठी आजी-माजी सैनिकांचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दिल्लीत होत असलेल्या सैनिकांच्या मागणीसाठी जंतरमंतर उपोषणाचा धुळ्यात आजी माजी सैनिकांनी पाठिंबा देऊन आंदोलन करण्यात आले. अनेक वर्षापासून माजी सैनिक यांच्या वाढीव पेन्शन व इतर मागण्यासाठी पाठपुरावा होत आहे. व काही दिवसांपूर्वी पूर्व न्यायाधीश नायडू साहेब यांनी सात ठिकाणी सभा घेतल्या होत्या परंतु त्या सभेत आमचा कुठलाही महत्त्वाचा विषय मांडला गेला नाही असा आरोप करण्यात आला. व त्यावेळेस त्यांनी असे आश्वासन दिले की मी शासनाचा प्रतिनिधी म्हणून मी शासनाचा पूर्णपणे पाठपुरावा करेल व तुमच्या मागण्या पूर्ण करू असे आश्वासन दिले परंतु आजपर्यंत कुठलीही मागणी पूर्ण झाली नाही. माजी सैनिकांना शासनाने पाच वर्षाची पुनर्वसित करण्याचे कबूल केले होते परंतु त्यात शासनाने तर्फे दिरंगाई करण्याचा आरोपही करण्यात आला . व त्याच बरेच तफावत आहे. एक सैनिक शहीद होतो त्याच्या पत्नीला पेन्शन 20 हजार रुपये आणि इतर अधिकाऱ्यांच्या पत्नीला सव्वा लाख रुपये पेन्शन आहे असा अन्याय का..? सैनिकाची पत्नी लाकडाची व अधिकारी ची पत्नी सोन्याची आहे का असे वक्तव्य ही या आंदोलनात करण्यात आले. आणि मेडिकल पेन्शन ही सर्वांना सारखे दिले पाहिजे.सैनिक असे व्यक्ती आहेत ज्यांचे लहान लहान मुले पत्नी वृद्ध आई-वडील सोडून जीवाची भाजी लावतात व देशाचे संरक्षण करतात त्यासाठी कुठलेही आंदोलन न करता आतापर्यंत संपूर्ण मागण्या पूर्ण करायला हवे होते. परंतु तसे न होता आम्हाला आंदोलन व उपोषण करण्याची वेळ आली आहे त्यामुळे शासनाने त्वरित यावर लक्ष देऊन सर्व आजी-माजी सैनिकांच्या मागण्या पूर्ण कराव्यात हीच अपेक्षा या आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आला.



## जैतर... खान्देशात घडलेल्या सत्य घटनेवर आधारित एक संगीतमय प्रेमकहाणी

आधुनिक केसरी न्यूज




**छत्रपती संभाजीनगर :** जैतर. . . चित्रपटाचे शीर्षक वाचून त्या शब्दाचा नेमका अर्थ काय असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. जसे 'मित्र' ह्या शब्दाला ग्रामीण बोलीभाषेत 'मैतर' असेही संबोधले जाते, अगदी त्याच्या विरुद्धार्थी 'जैतर' हा शब्द आहे. म्हणजेच हितचिंतक नसलेला तो 'जैतर'. अर्थात, हा शब्द उत्तर महाराष्ट्रात खान्देश प्रांतातातील बोलीभाषेत प्रचलित आहे.

'जैतर' ही एका विद्यार्थीदशेतील प्रेमीयुगुलाची, मालेगावात घडलेल्या एका सत्यघटनेवर आधारित गोष्ट आहे. जाती, वर्ण, आर्थिक स्तर आदी गोष्टींवरून समाजात भेदाभेद होतो. त्याचे पडसाद अनेकदा प्रेमप्रकरणात किंवा लग्नादरम्यान उमटतात आणि प्रेमीयुगुलाला संघर्षाला तोंड द्यावे लागते. ग्रामीण भागात ह्या संघर्षाचे गंभीर परिणाम अनेक अंगाने मुलीला भोगावे लागतात. प्रामुख्याने तिच्या शिक्षणावर आणि एकूणच स्वातंत्र्यावर बंदी येते. चित्रपटाचे कथालेखक आणि निर्माते मोहन घोंगडे हे मूळ शेतीव्यावसायिक आहेत. मालेगावात प्रेमप्रकरणावरून घडलेल्या 'त्या' सत्य घटनेत त्यांना याहून गंभीर समस्या दिसली आणि त्यांचे संवेदनशील मन व्यथित झाले. त्या समस्येला वाचा फोडण्यासाठी त्यांनी जैतर ही कथा लिहीली आणि त्याला समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी सिनेमा हे माध्यम निवडले व 'जैतर' ह्या सिनेमाची निर्मिती झाली.

या चित्रपटाचा संगीत व ट्रेलर प्रकाशन सोहळा मुंबईच्या फेमस स्टुडीयोत चार दशकाहून अधिक काळ मनोरंजन पत्रकारितेत भरीव योगदान दिलेले ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी सिनेमातील प्रमुख कलावंत रजत गवळी, सायली पाटील, गणेश सरकटे, गीतकार विष्णू थोरे, संगीतकार योगेश खंदारे आणि निर्माता मोहन घोंगडे व इतर तंत्रज्ञ उपस्थित होते. गीतकार मंगेश कांगणे, विष्णू थोरे आणि योगेश खंदारे यांच्या रचनांवर संगीतकार योगेश खंदारे यांनी संगीतबद्ध केलेली गाणी हे या चित्रपटाचे बलस्थान आहे. सुप्रसिद्ध गायक आदर्श शिंदे यांच्या आवाजातील 'देव मल्हारी' हा गोंधळ ताल धरायला लावणारा तर अवधूत गुप्ते यांनी गायलेले 'आधाराचं आभाळं' हे विरहगीत काळजाचा ठाव घेणारे आहे. हर्षवर्धन वावरे-कस्तुरी वावरे ह्या गायक दांपत्याने गायलेलं 'गुलाबी जहर' प्रेमगीत मनाला रुंजी घालणारे तर संगीतकार योगेश खंदारे यांनी लिहिलेले तसेच गायलेले 'होऊ दे कल्ला' हे मस्तीगीत बहार आणणारे आहे.

चित्रपटाची पटकथा-संवाद आणि दिग्दर्शन घनःश्याम पवार यांचे आहे. कागदावरचे दाहक वास्तव मनोरंजनाच्या माध्यमातून दृश्यरूपात आणण्यात दिग्दर्शकाने त्यांचे कसब पणाला लावले आहे. कथानकाची गरज ओळखून चित्रीकरण खान्देशात करण्यात आले आहे. त्यामुळे चित्रपटाला एक खानदेशी स्पर्श लाभला आहे. या चित्रपटात रजत गवळी आणि सायली पाटील हे दोन नवोदित कलाकार प्रमुख भूमिकेत असून गणेश सरकटे, गायत्री सोहम, अविनाश पोळ, रामेश्वर डापसे, अरुण गीते, स्मिता प्रभू, जीवन महीरे तसेच संग्राम साळवी सह इतर कलाकारांनी भूमिका वठविल्या आहेत. प्रेमसंबंधातून घडलेल्या एका सत्यघटनेवर आधारित, शिवमल्हार पुजा फिल्म प्रोडक्शन निर्मित, निर्माता मोहन घोंगडे लिखित, घनःश्याम पवार दिग्दर्शित, धीरज वाघ यांच्या कॅमेरातून सजलेला आणि संगीतकार योगेश खंदारे यांच्या संगीतसाजाने नटलेला 'जैतर' हा चित्रपट येत्या १४ एप्रिल रोजी महाराष्ट्रभर सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

## भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्ता मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद :** येथे शक्तिकेंन्द्र प्रमुख, बुथप्रमुख व सर्व गावातील कार्यकर्त्याच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या मेळाव्यास मार्गदर्शन करताना आमदार बंब म्हणाले की सर्व मतभेद बाजूला सारून सर्वानी एकजुटीने कामाला लागा, सर्व पदाधिकाऱ्यांनी जनतेचे सार्वजनिक कामे करावी, आता निधीची आपल्याकडे कमतरता नाही आताच्या बजेटमध्ये 189 कोटी रूपयांची कामे आपण मंजूर केली असून गावागावाला जोडणारे छोटे- मोठे रस्ते व पुल मंजूर केले असून अनेक योजनांच्या माध्यमातून तालुक्यातील नागरिकाचा विकास करण्याचा मानस असल्याचे ते म्हणाले. सर्व कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन आमदार बंब यानी कार्यकर्त्याला केले.

या कार्यक्रमास भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, शहराध्यक्ष सतिश दांडेकर, जि.प उपाध्यक्ष एल जी.गायकवाड, सुरेश सोनवणे, भिमराव खंडागळे, ज्ञानेश्वर नलावडे,माजी सभापती गणेश अधाने, माजी उपसभापती दिनेश अंभोरे, प्रकाश चव्हाण, प्रभाकर शिंदे, युवराज ठेंगडे, उपनगराध्यक्ष सुरेश मरकड, नगरसेवक परसराम बारगळ, योगेश बारगळ, राहुल निकुंभ, विकास कापसे, संदिप निकम, संतोष जोशी, राहुल चव्हाण, अविनाश वेताळ, सौरभ खंडेलवाल, सतिश जैस्वाल, संतोष राजपूत, संजय राजपूत, सागर मातकर, सुखदेव ठेगडे, मनोज गुळवे, किरण बोडखे, अनिल कारभाळ, आप्पाराव वाकळे, कृष्णा चव्हाण, बाळु नलावडे, किशोर नलावडे, सोमिनाथ तुरेवाले, बबन वर्दे, रंगनाथ काळे, भरत गोरे, आजिनाथ जाधव, सुरेश जाधव, भागचंद जोनवाल, प्रेम जोनवाल, रवी पवार, संतोष गायकवाड, प्रदीप निकम, संदिप कामठे, सुभाष ठोंबरे, सत्तार पटेल, मुकतार पठाण, रावसाहेब देशमुख, अंकुश काळे, गणेश काळे, सुखदेव वेताळ, सतिश खंडागळे, अशोक खंडागळे, विजय आघाडे, रावसाहेब तांदळे, शिवाजी गायकवाड, अविनाश कुलकर्णी, आशिष कुलकर्णी, नरेंद्र सावळे, विलास चव्हाण, शेरूभाई, अमोल गवळी, द्वारकादास जाधव, गजानन साबळे, बाबासाहेब औटे , नंदकुमार चव्हाण, सचिन चव्हाण,गणेश वाकळे, बाबासाहेब नागे, अंकुश होळकर, प्रशांत गदानकर, योगेश काळे, सतिश अहेवाड, किरण बोडखे, सुरेश मालोदे, सय्यद अफसर, संदिप कामठे, तसेच तालुक्यातील सर्व गावातील शक्तिकेंन्द्र प्रमुख, बुथप्रमुख व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## फुलंब्री येथे भा.ज.पा तालुका अध्यक्ष सुहास शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले उत्सव समिती

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे प्रथम नगराध्यक्ष तथा भा.ज.पा तालुका अध्यक्ष सुहास शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले उत्सव समितीच्या नेमणुका केल्या अध्यक्ष आकाश गोरवणे उपाध्यक्ष अतुल रघुराम हापत सचिन शुभम बळी कार्य अध्यक्ष राहुल ढोले कोसा अध्यक्ष अमोल चोपडे यांची निवड करण्यात आली याप्रसंगी उपस्थित योगेश मिसाळ राम बनसोड बाबासाहेब शिंगारे गणेश राऊत अजय शेरकर सचिन शेरकर एकनाथ डोके सुमित प्रधान रवींद्र काथार व सर्व युवा मित्र आणि फुलंब्री नगरीच्या नागरिकांनी बैठकीत समिती नेमली त्याबद्दल सर्वांना शुभेच्छा दिल्या.

RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
R ENTERPRISES
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com




# आंतरराष्ट्रीय ब्राह्मण संघटनेच्या वतीने जयंत पाटील -अजित पवार यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील आणि ज्येष्ठ नेते आणि विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांचा आंतरराष्ट्रीय ब्राम्हण संघटनेच्यावतीने आज राष्ट्रवादी भवन, मुंबई इथे सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

राज्यभरातील ब्राम्हण समाजाच्या बांधवांनी एकत्र येऊन हा सत्कार केला. दरम्यान, ब्राम्हण समाजाच्या प्रश्नांना न्याय मिळण्यासाठी कार्य करणारे मकरंद कुलकर्णी यांनाही मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. महाराष्ट्रात प्रत्येक समाजात आर्थिक आणि दुर्बल घटक असतात. त्यांना अनंत अडचणींना तोंड देत काम करावे लागते. समाजातील अशा व्यक्तींना उभारी देणे हे समाजसुधारणेचे काम आहे. ही शिकवण आदरणीय शरद पवारसाहेबांनी आम्हाला दिली आहे असे जयंत पाटील यांनी आवर्जून सांगितले. समाजातील वेगवेगळ्या वर्गाने ज्या-ज्या वेळी आरक्षणाची मागणी केली त्यावेळी पवारसाहेब आवर्जून सोबत उभे राहिले. या कार्यक्रमाला पक्षाचे कोषाध्यक्ष हेमंत टकले, प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, ठाणे शहराध्यक्ष व माजी खासदार आनंद परांजपे, युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, युवक कार्याध्यक्ष सूरज चव्हाण, आंतरराष्ट्रीय ब्राम्हण संघटनेचे विजय जमदग्नी, गजानन जोशी, बाळासाहेब पांडे, मनोज गाजरे, प्रदिप अष्टेकर, स्वानंद गोसावी, यशवंत कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.





# विठ्ठल-रुक्मिणीची चैत्री एकादशीनिमित्त नित्यपूजा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

ज्योती खिलारे

**पंढरपूर :** चैत्री शुध्द कामदा एकादशी निमित्त मंदीर समितीच्या वतीने श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेची नित्यपूजा संपन्न झाली. विठ्ठलाची नित्यपूजा मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांनी कुटुंबियासमवेत तर रुक्मिणी मातेची नित्यपूजा मंदीर समितीचे सदस्या ॲड. माधवी निगडे यांनी कुटुंबीयांसमवेत केली. चैत्री एकादशी निमित्त मंदीरात विविध फुलांची सजावट करण्यात आली आहे.

चैत्री एकादशीला भाविकांना सुलभ दर्शन व्हावे यासाठी मंदीर समितीच्यावतीने आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या असून, समितीच्या वतीने दर्शनरांगेत व दर्शन मंडपात, स्वच्छ पिण्याचे पाणी, शौचालये, लाईव्ह दर्शन आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दर्शनरांग दर्शनमंडप, मंदीर व मंदीर परिसर या ठिकाणची वेळोवेळी स्वच्छता करण्यात येत आहे. दर्शनासाठी येणा-या भाविकांसाठी मंदिर समितीच्या वतीने विमा काढण्यात आला आहे. श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप येथे चौकशी कक्ष उभारण्यात आला आहे. त्यामध्ये मराठी, इंग्रजी, हिंदी, कन्नड व तेलगू भाषा अवगत असलेले कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. दर्शनरांगेत मोफत खिचडी व ताक वाटप करण्यात येत आहे. चंद्रभागा वाळवंट व पत्राशेड येथे महिला भाविकांच्या सोईसाठी चेंजिंग रूम व दर्शनरांगेत हिरकणी कक्ष उभारण्यात आला आहे.

# अनेकांची इच्छा परंतु पाण्याच्या संघर्षासाठी निवडणुकीचा त्याग : शिवराज पुकळे

आधुनिक केसरी न्यूज



**पिलीव :** महाराष्ट्र राज्यातील बाजार समितीच्या निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. माळशिरस तालुक्यातील अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीची सुध्दा निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे यामध्ये फॉर्म भरायला सुरुवात झाली आहे.माळशिरस तालुक्यात अनेक दिवसांपासून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे शिवराज पुकळे यांनी शेतकऱ्यांसाठी सुध्दा अनेक आंदोलने केली आहेत. ऊसाच्या दराचे आंदोलन, वीजजोडणी विरोधात आंदोलन, हमीभाव साठी आंदोलन, पीकविमा साठी आंदोलन, ऊस बीलासाठी आंदोलन, दुध दरवाढीसाठी आंदोलन असे शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अनेक आंदोलने केली आहेत. त्यामुळे अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून ते जर संचालक झाले तर शेतकऱ्यांना विविध योजना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतील.शेतकरी हक्कासाठी लढत असल्याने स्वतः अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक झाले तर शेतकऱ्यांना न्याय मिळवून देतील म्हणून पिलीव ग्रामपंचायत सदस्य जीवन गुरव यांच्यासह अनेक ग्रामपंचायत सदस्यांनी आपल्या हक्काच्या माणसाला बाजार समितीत संचालक म्हणून पाठवण्यासाठी माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील युवा नेते शिवराज पुकळे यांनी निवडणूक लढवावी असे मत व्यक्त केले होते.अनेक ग्रामपंचायत सदस्य शिवराज पुकळे यांच्या संपर्कात असताना सुद्धा बचेरी गावातील लोकांनी पाण्यासाठी मतदानावर बहिष्कार टाकला आहे त्यामुळे शिवराज पुकळे यांचे असे मत आहे की मी ज्या माळशिरस तालुक्यातील २२ दुष्काळी गावांच्या पाणीप्रश्नांसाठी लढा उभा केला आहे त्यातीलच बचेरी या गावाने पाण्यासाठी बहिष्काराचा निर्णय घेतलेला असल्याने मी जर निवडणूक लढवली तर त्या गावातील लोकांच्या भावनेचा अनादर केल्यासारखे होईल म्हणून ज्या सर्वांनी मी निवडणूक लढवावी अशी भावना व्यक्त केली त्यांचे आभार मानून दिलगीरी व्यक्त करणार आहे.परंतु अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक लढवणार नाही असे माध्यमांशी बोलताना पुकळे यांनी सांगितले.





(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in


# अलीशा, अश्मीरा सय्यद यांनी ठेवला जीवनातला पहिला रोजा..!

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** तालुक्यातील गंधेश्वर परिसरात राहनारे सय्यद बाबर पहिलवान यांची पुतनी सय्यद अलीशा फजलू वय 5 वर्ष , अश्मीरा फजलू सय्यद वय 7 वर्ष यांनी पवित्र रमजान महिन्यात आपल्या जीवनातला सर्वप्रथम उपवास ठेऊन रोज्याची सुरवात केली. दोन्ही बहीनानी पहाटे 5 वाजेपासुन उपवास धरला होता. तसेच सायंकाळी 7 वाजेच्या दरमियान उपवास सोडला. पूर्ण दिवस भर काही न खाता पिता दिवसभराचा उपवास केला. सायंकाळी उपवास सोडून आई वडिलांनी नवे कपडे, व पुष्प गुच्छ देऊन स्वागत करण्यात आला, तसेच दिवस भर न खाता, न पिता रख रख त्या उन्हात उपवास ठेवल्याने सर्वत्र कौतुक केले जात आहे.



यावेळी, बाबर सय्यद पहिलवान, पत्रकार सय्यद आरेफ़, सय्यद सोहेल, सय्यद शोहेब, सय्यद फजलू, यांच्या सोबत नाते वाईकांची उपस्थिती होती.

# अट्टल घनवन प्रकल्पातील झाडांची होतेय कत्तल !

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** तालुक्यातील पुर्णवसीत झालेले गाव मौजे राणी वाहेगाव येथे व पंढरपूर ते शेंगाव दिंडी मार्गालगतच सण २०१९ मध्ये सार्वजानिक वनिकरण विभागाच्या वतीने अट्टल घणवण प्रकल्प राबणीण्यात आला होता त्यात एकुण पंधरा हजार रोपांची लागवड करण्यात आली होती. मंध्यतरीच्या कालावधीत वणीकरण विभागाने या रोपांची देखभाल करूण रोपांची संख्या मोठमोठाल्या झाडांत झाली असल्यामुळे काहींनी अट्टल घणवण प्रकल्पाच्या मागच्या बाजूला असलेले तार कंपाऊंड व समोरील बाजूस असलेले मुख्य गेट तोडुण अनेक वृक्षाची तोड करुण त्यापासुन निघालेली लाकडे, सामृग्री घेऊन गेलेले आहेत. सार्वजनिक वनिकरणाच्या अधिकारऱ्यांनी वेळीच लक्ष दिल्यास उर्वरीत प्रकल्पातील झाडे वाचतील तसेच प्रकल्पांतील झालेली वृक्षतोड कुणी केली याचाही शोध घेऊन कार्यवाही करण्यात यावी असा आवाज पर्यावरण प्रेमींकडुण होत आहे. तसेच यापुढे घणवण प्रकल्पातील वृक्षांची तोड होणार नाही यांकरिता सार्वजणीक वनिकरण विभागाने उपाय योजना कराव्यात.






# सावळदबारा येथे अब्दुल सत्तार यांची सांत्वन भेट

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील प्रतिष्ठित नागरिक रत्नाकर आप्पा चोपडे व ग.भा.कमलाबाई नारायण देशमुख या जेष्ठ महिलाचे २९ मार्च रोजी शुक्रवार सावळदबारा येथे अल्पशा आजाराने निधन झाले होते.तर छत्रपती संभाजीनगर येथे रुग्णालयात रत्नाकर रामूआप्पा चोपडे सावळदबारा या प्रतिष्ठित नागरिक यांचे १ एप्रिल शनिवार रोजी निधन झाले होते या निमित्ताने सिल्लोड, सोयगाव मतदार संघाचे कृषिमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी शोकाकुल चोपडे व देशमुख परिवाराच्या घरी येऊन सांत्वन भेट दिली. घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी असून या घटनेमुळे चोपडे तसेच देशमुख कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत अशा शब्दांत कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी शोक व्यक्त केला.

यावेळी जिल्हा परिषदेचे सदस्य गोपीचंद जाधव, बबलूशेट हाझी साहेब, माजी सरपंच दारासिंग चव्हाण, सरपंच सुरेश चव्हाण, माजी सभापती धरमसिंग चव्हाण, सरपंच भागवत जाधव, सरपंच ज्ञानेश्वर वारंगणे, नितीन जैस्वाल,बाळूशेट भंन्साळी, संतोष आडे सरपंच,राहूल हेलोडे सरपंच,आदिंसह शोकाकुल देशमुख व चोपडे परिवारातील सदस्य व गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# वैजापूरला निधी कमी पडू देणार नाही : आ. बोरनारे

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहराच्या सर्वांगीन विकासासाठी पासष्ट कोटी रुपये निधी शासनाकडून मिळविला असुन यातून रस्ते, सामाजिक सभागृह, शादीखाना, मंगल कार्यालये, सार्वजनिक उद्याने ऊभी राहत आहेत याही पुढे आणखी निधी मिळवून शहराच्या धार्मिक स्थळांची, सामाजिक स्थळांची, नाट्यगृह, शैक्षणिक संकुल व अभ्यासिका यांची निर्मिती करून शहराची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करणार असल्याचे ठोस आश्वासन वैजापूर-गंगापूर तालुक्याचे आ.रमेश पा. बोरनारे यांनी रविवार (ता.०२)रोजी श्री कालिका माता मंदिर सभामंडप भूमिपूजन समारंभ प्रसंगी केले. या सभामंड पाला आ.बोरनारे यांनी पन्नास लक्ष रुपये निधी आमदार फंडातून उपलब्ध करून दिला व आणखी पन्नास लक्ष रुपये देणार असल्याचे जाहीर केले. कार्यक्रमास नगराध्यक्षा शिल्पाताई दिनेशभाऊ परदेशी, उपनगराध्यक्ष साबेरखान, नगरसेवक दशरथ बनकर, स्वप्नील जेजुरकर, शैलेश चव्हान, इम्रान कुरेशी सुप्रिया व्यवहारे, गणेश खैरे, शिवसेना प्रमुख राजेंद्र पा. साळुंके, शहर प्रमुख पारस घाटे, रामहरी जाधव, श्रीराम गायकवाड, तसेच ज्ञानेश्वर टेके, बजरंग मगर, गोकुळ भुजबळ, सौ.सुलभा भोपळे, सीताराम पा. वैद्य,रामकृष्ण जोरे, बळीराम राजपूत, कमलेश आंबेकर,गौरव दौडे, गोविंद शेठ धुमाळ गणेश धुमाळ,रमेश कोळपकर, विनोद विश्वबर यांच्या सह क्षत्रिय सोमवंशी कासार समाजाचे स्त्री पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचलन व प्रास्ताविक राजपूत यांनी केले. आभार ज्ञानेश्वर धुमाळ यांनी मानले, सुरेश धुमाळ व सुरेखा धुमाळ यांनी सपत्नीक पूजन केले.

# गोकुळसिंग राजपूत यांना जयहिंद पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** येथील पुष्कर बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने मातृभूमी रेस्क्यू कमांडो फोर्स विभाग प्रमुख प्रदीप गोकुळ पाटील यांच्या वतीने सोयगांव तालुक्यातील सावळदबारा येथील जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत यांना 2023 चा जयहिंद पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदरील पुरस्कार सोहळा हा रविवार दि. २६ मार्च २०२३ रोजी सायं ४ वा. ३० साई कॉलनी,सावरखेडा रोड पिंप्राळा जळगाव येथे पार पडला तेव्हा त्या पुरस्कार सोहळ्यात जेष्ठ पत्रकार गोकळसिंग राजपूत यांना सन 2023 चा "जयहिंद पुरस्कार" देऊन गौरविण्यात आले. सदरील पुरस्कार हा मातृभूमी रेस्क्यू कमांडो फोर्सच्या वर्धापन दिना निमित्ताने सामाजिक, शैक्षणिक, देशसेवेत, पत्रकारिता सेवेत कार्य बजावणाऱ्या युवकांना, पत्रकारांना, सामाजिक कार्यकर्त्यांना "जयहिंद पुरस्कार" २०२३ देण्यात आला आहे. यावेळी प्रमुख पाहुणे संदीप पाटील, (आर्मी नाईक) प्रकाश पाटील (कवी), सुनील भटकर (चित्रपट दिग्दर्शक), यशवंत दापोरकर, ( दापोरेकर ज्वेलर्स चे संचालक), तुषार



सोनार (सामाजिक कार्यकर्ते), अरविंद काकडेजी, आदिनाथ जाधव (एन.डी.एफ. फोर्स इनव्हेस्टिगेटर चीफ ऑफिसर), अभिजीत नलावडे (एमसीएफ फोर्स चे संस्थापक अध्यक्ष), संतोष वायदंडे (एमसीएफ फोर्स चे सचिव) रविंद्र कोळी (सामाजिक कार्यकर्ते), विजयसिंग पाटील, जगदीश सोनवणे (सामाजिक कार्यकर्ते) उपस्थित होते.या पुरस्कार सोहळयाचे मानकरी संदीप रंधे (पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते, इकबाल पिंजारी,(मु.अ.) बाळकृष्ण रडे, अविनाश जाधव, संदीप पाटील, आर्मी नाईक, अभिजित नलावडे mcf संस्थापक अध्यक्ष, संतोष वायदंडे mcf फोर्स चे सचिव यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आणि मान्यवरांनी पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या. तर कार्यक्रमाचे सुत्रांचालन व आभार प्रदिप गोकुळ पाटील यांनी मानले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत यांना शुभेच्छा दिल्या.

# सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथे श्रीराम नवमी मोठ्या उत्साहात व पारंपारिक पद्धतीनेगुरुवार रोजी साजरी करण्यात आली. गावात श्रीराम जन्मोत्सव श्रीराम नवमी निमित्त भव्य दिव्य शोभायात्रेचे आयोजन जय बजरंग मित्र मंडळ तर्फे करण्यात आले होते. शोभायात्रा मारुती मंदिराहून दुपारी चार वाजता ट्रॅक्टरला भगवे ध्वज जिलेटिन लाइटिंगने सजवून ट्रॅक्टर मध्ये भगवान श्रीरामांची प्रतिमा ठेवून मारुती मंदिराजवळून ते हरिहर मंदिर शिवाजी चौकातून श्री चक्रधर स्वामी मंदिराजवळून राजमाता अहिल्यादेवी चौकात प्रमुख रस्त्यावरून शोभायात्रा काढण्यात आली. व जय बजरंग मित्र मंडळातर्फे गावात महाप्रसाद भंडाऱ्याचा कार्यक्रम ही करण्यात आला होता. याप्रसंगी गावातील श्रीराम भक्त व महिला लहान मुलं मुली मोठ्या संख्येने या शोभायात्रेत सहभागी झाले होते मिरवणुकीमध्ये काही अनुचित प्रकार घडू नये याकरिता सपोनि भरत मोरे फर्दापूर यांच्या मार्गदर्शनाखाली फर्दापुर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब जोगदंड, सावळदबारा



पोलीस चौकीचे बीट जमादार मिर्झा तडवी, पोलीस कॉन्स्टेबल शिवदास गोपाल व फर्दापूर पोलीस स्टेशनचे कर्मचाऱ्यांनी बंदोबस्त ठेवला होता.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अ‍ॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर



# प्रणव जगताप यांची राष्ट्रभक्तीपर गीतांच्या निनादात मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** तालुक्यातील लोणी खुर्द येथील प्रणव हा भारतीय नौ सेना अग्निविर् प्रशिक्षण पूर्णकरून पुढील काळात देश सेवेसाठी जातोय, राष्ट्रभक्तीपर गीतांच्या निनादात त्यांच्या राहत्या घरापर्यंत वाजत, गाजत मिरवणुक काढण्यात आली.गावकऱ्यांच्या झालेला अनोखा सत्कार पाहून. प्रणव जगताप.वडिल विजयकुमार आई संगीता जगताप भारावून गेले. आपल्या मूळ गावी येणार असल्याने गावकऱ्यांनी त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी केली होती.लोणी खुर्द येथील विनायकराव पाटिल प्रवेशद्वारावर आगमन होताच लोणीखुर्द,गावातील नागरीक,नातेवाईक व्यावसायीक, शाळा ,महाविद्यालय ग्रा.पं.कार्यालय, विविध संघटना,अधिकारी पदाधिकारी यांनी त्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पहाराने स्वागत केले.वाजत गाजत राष्ट्रभक्तीपर गीतांच्या निनादात त्यांच्या राहत्या घरापर्यंत वाजत, गाजत मिरवणुक काढण्यात आली. गल्लोगल्ली गावातील महिलांनी रांगोळी काढुन औक्षण करीत स्वागत केले. शाल,श्रीफळ व पुष्पहार देवुन सत्कार करण्यात आला.

गावकर्यायांच्यावतीने झालेला अनोखा सत्कार पाहून आईवडील भारावून गेले. प्रणव जगताप यांचा एका समांन्य कुटुंबातील एक मुलगा देश सेवेसाठी जातोय.प्रणवचे वडील विजयकुमार जगताप यांनी जिथे भरेल आपला डेरा तोच गाव बरा ही अपेक्षा ठेऊन १९९०या वर्षी बोलठाण आपल गाव सोडून एका किराणा दुकानावर काम करत पुढे ,लोणी खुर्द येथे टेलर काम करून आपली उपजीविका भागवत जीवन जगात असताना डॉ घाडगे व पहाडे या दोन गाव वाल्यांच्या मार्गदर्शनाने आपला पिढीजात उद्योग शिवण कामावर मुख्य बाजार पेठेत स्वतःचे दुकान सुरू केले ,,उतरोतर प्रगती करत ,आई वडील मोठे दोन भाऊ यांच्या उपजीविका भागवत मुलगा प्रणव याचे माध्यमिक शिक्षण जिल्ह्याच्या ठिकाणी करून ,मुलाचे शिक्षण करून त्यास पुढील उ माध्यमिक शिक्षणासाठी भोसला मिलिटरी स्कूल नाशिक,येथे पूर्ण करून मुलाला मार्गदर्शन केले.

# गावठी कट्टा बाळगणारा गुन्हे शाखेच्या ताब्यात

## दहशत माजवण्याच्या उद्देशाने सोबत कट्टा ठेवल्याचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** हेमंत पाटील यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की , भरत कैलास पावरा रा.धमाने चौफुलो , पाण्याचा प्लांटच्या मागे ता.जि. धुळे हा देशी बनावट अग्नीशरण व काडतूस बाळगुन असले बाबत गुप्त बातमी मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेकडील अधिकारी व अंमलदारांना बातमी प्रमाणे कारवाई करण्याचे आदेशीत केले त्या अनुषंगाने पथक रवाना होवून सदर संशयीत भरत कैलास पावरा वय ३० व्यवसाय ट्रॅक्टर चालक , रा . धमाने चौफुली , पाण्याचा प्लांटच्या मागे ता . जि . धुळे यास त्याचे राहते घरून ताब्यात घेवून त्यांचे कब्जात देशी बनावटीचे गावटी रिव्हॉल्वर व रिकामे काडतुस मिळुन आले . रिकामे काडतुस इसम नामे भरत कैलास पावरा हा गंभीर स्वरूपाचा दखलपात्र गुन्हा करण्याच्या उददेशाने बेकायदेशीर रित्या सोबत बाळगत असल्याची खात्री झाली सदर मुद्देमाल जप्त करून संबंधीतां विरूध्द किशोर ताराचंद पाटील नेम , स्था . गु.शा. धुळे यांचे तक्रारीवरून पश्चिम देवपुर येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे . सदरची कारवाई श्री . संजय वारकुंड , पोलीस अधीक्षक , धुळे श्री . किशोर काळे , अपर पोलीस अधीक्षक , धुळे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री हेमंत पाटील , पोसई प्रकाश पाटील , असई संजय पाटील , संदीप पाटील, पंकज खैरमोडे, महेंद्र सपकाळ ,किशोर पाटील , योगेश जगताप अशांनी केली आहे .



# अट्रावल दंगल; ११० जणांविरुद्ध गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव:** यावल तालुक्यातील अट्रावल येथे शनिवारी दोन गटांत झालेल्या हाणामारी प्रकरणी दोन्ही गटांसह शासनातर्फे पोलीस उपनिरीक्षक सुनीता कोळपकर आणि पोलीस शिपाई अशोक बाविस्कर यांनी तक्रारी दाखल केल्या आहेत. याप्रकरणी ११० जणांविरुद्ध विविध कलमांसह दंगलीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आतापर्यंत पोलिसांनी १५ जणांना अटक केली आहे. अट्रावल येथे शनिवारी सकाळी दोन गटांत दगडफेक होऊन हाणामारी झाली होती. यात १० ते १२ जण जखमी झाले. यासंदर्भात शनिवारी रात्री उशिरा यावल येथील पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी गटांकडून गुन्हे दाखल करण्यात आले. त्यात एका गटाकडील विजय कोळी यांनी ५९ जणांविरुद्ध, तर दुसऱ्या गटातील दिवाकर तायडे यांनी ५१ जणांविरुद्ध तक्रार दिली. तसेच पोलीस प्रशासनातर्फे उपनिरीक्षक कोळपकर आणि पोलीस शिपाई बाविस्कर यांनी तक्रार दिली आहे. एकूण ११० जणांविरुद्ध दंगलीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी रविवारी १५ संशयितांना अटक केली आहे. रविवारी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सोनवणे यांच्यासह फैजपूर येथील सहायक निरीक्षक सिद्धेश्वर आखेगावकर, अविनाश दहिफळे यांच्यासह दंगलविरोधी पथक व पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला. सध्या गावात तणावपूर्ण शांतता आहे. प्रशासनातर्फे पोलीस अधीक्षक एम. राजकुमार यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविला आहे. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असा आवाहन डॉ. सोनवणे यांनी केले आहे.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया - आंबेडकर गटाच्या जिल्हाध्यक्षपदी दिनेश निकुंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दि. 30 मार्च रोजी नुकतीच रिपाई - आंबेडकर गटाचा केंद्रीय कार्यालय चेंबुर येथे आढावा बैठक व कार्यकर्ता मेळावा राष्ट्रीय अध्यक्ष मा. दिपक निकाळजे , राष्ट्रीय सचिव मा. मोहनलाल पाटील , प्रदेश महिला अध्यक्ष मा. सुनिता चव्हाण व महाराष्ट्रातील प्रमुख पदाधिकऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या वेळी स्थानिक निवडणुका बाबत नियोजन, प्रत्येक जिल्ह्यात कामाची रूपरेषा कशी असावी व संपूर्ण महाराष्ट्रात महागाई विरोधात रिपब्लीकन पार्टीचे एकाच दिवशी मोठया प्रमाणात आंदोलन होणार आहे त्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना तयारीला लागण्याचे आदेश देण्यात आले.

यावेळी विविध पदाच्या नियुक्त्या करण्यात आल्या त्यात धुळे जिल्हा अध्यक्ष पदी दिनेश राज निकुंभ यांची व धुळे जिल्हा प्रसिध्दी प्रमुख महेश खैरनार यांची संपूर्ण महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांचा उपस्थितीत राष्ट्रीय अध्यक्ष मा. दिपक निकाळजे यांच्या हस्ते नियुक्त्या करण्यात आल्या यावेळी स्वप्निल मोहिते , किशोर कुवर , विशाल कटारे उपस्थित होते.



# लाकडाचा ठोकळा डोक्यात पडला, अठरा वर्षीय तरुणाचा दुर्दैवी अंत

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** लाकडी ठोकळा डोक्यावर पडल्याने झालेल्या रक्तस्रावामुळे अठरा वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अरुण कुमार मांडवी असे दुर्दैवी मृत्यू झालेल्या युवकाचे नाव आहे. तो नाशिक शहरातील गंगापूर रोड परिसरातील आनंदवल्ली शिवारात राहत होता. नेहमीप्रमाणे कामावर गेल्यानंतर काम सुरु असताना ही घटना घडली. मूळचा परराज्यातील असणारा अरुण हा कामानिमित्त नाशिक शहरात वास्तव्यास होता. शहरातील गंगापूर रोड भागातील एका बांधकाम साईटवर तो कामगार म्हणून जात होता. 31 मार्च रोजी नेहमीप्रमाणे साईटवर गेल्यानंतर काम सुरु होते. अशातच बांधकाम साईटवरील वरच्या माळ्यावरुन अचानक एक लाकडी ठोकळा त्याच्या डोक्यात पडला. या घटनेत तो गंभीर जखमी झाला. डोक्यावर ठोकळा पडल्याने रक्तस्राव अधिक झाल्याने त्याला भाऊ गणेश भगत याने तात्काळ जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासून त्यास मयत घोषित केले. अरुण हा आनंदवल्ली शिवारात वास्तव्यास होता. त्या ठिकाणाहून तो कामावर जात असे. दरम्यान 31 मार्च रोजी सकाळी नेहमीप्रमाणे कामावर गेला. यावेळी काम सुरु असताना अचानक लाकडी ठोकळा त्याच्या डोक्यात पडला. यात तो गंभीर जखमी झाल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. दोन दिवसांच्या उपचारानंतर त्याचा मृत्यू झाल्याचे तापसी अंमलदार झिरवाळ यांनी सांगितले. याबाबत गंगापूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. शहरातील दुसऱ्या एका घटनेत एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. सहर्ष राजेंद्र भालेराव असे या तरुणाचे नाव आहे. हा तरुण मित्रांसमवेत रामकुंड परिसरात पोहण्यासाठी गेला होता. यावेळी मित्रांसोबत त्यानेही वाहत्या पाण्यात उडी मारल्यानंतर पाण्याचा अंदाज न आल्याने दोघे जण बुडाले. यातील एकाला वाचवण्यात यश आले तर सहर्षचा दुर्दैवी मृत्यू झाला. सध्या गंगापूर धरणातून पाणी सोडण्यात आले असून गोदावरीतून पाणी वाहत आहे. अशातच शहरातील काही मित्रांचा ग्रुप हा पोहण्यासाठी रामकुंडावर आला होता. यात सहर्ष देखील होता. रामकुंडाजवळील गांधी तलावात मित्रांसमवेत तो देखील पोहण्यासाठी उतरला. मात्र त्याच दरम्यान पाण्याचा प्रवाह हा अधिक असल्याचा त्यांना अंदाज न आल्याने दोघे जण पाण्यात वाहू लागले होते. त्यातील एकाला वाचविण्यात आले. मात्र, सहर्ष हा पाण्यात बुडाला, उशीरानंतर त्याला बाहेर काढण्यात आले. तात्काळ जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तात्काळ तपासल्यानंतर त्याचे निधन झाल्याचे सांगितले. या घटनेने कॉलेजसह मित्रा परिवारात हळहळ व्यक्त केली जात आहे. भालेराव कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# जळगावचा युवक करतोय 'मुक्या प्राण्यांसाठी' पाण्याची सोय

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** येथील पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रदीप पाटील हे जळगाव शहरात एप्रिल-मे महिना म्हणजे डोक्यावर आग ओकणारा सूर्य.. चाळीशी ओलांडलेला पारा.. उन्हामुळे वाहणाऱ्या घामाच्या धारा... या उन्हाचा तडाखा आपल्याला बसतो तसाच तो मुक्या प्राण्याना सुद्धा बसतो.

उन्हामुळे त्रासलेल्या भटक्या-मुक्या प्राण्यांना पिण्यासाठी पाणी कोठून मिळणार ? त्याचा विचार कोणीच करीत नाही. त्यामुळे बरेच मुके प्राणी पाण्याअभावी मरण पावतात. हीच बाब लक्षात घेऊन साला बादा प्रमाणे या वर्षी देखील प्रदिप या युवकाने पशु-पक्षी व भटक्या प्राण्यांसाठी २५० ते ३०० कुंड बनविण्याचे काम हाती घेतले असून ठीक ठिकाणी पाणपोई उभारण्याचे कार्य करित आहे. ज्या नागरीकांना ही पाण्याची कुंड हवी असतील त्यांनी ही कुंड आपल्या घराबाहेर ठेवावी, ना नफा ना तोटा घेता ही कुंड मोफत देणार आहे , त्या बदल्यात त्यांनी फ़क्त नियमीत त्या कुंडाची काळजी घ्यावी. दरदिवशी नियमित कुंड स्वच्छ करुन त्यात पाणी भरणे हीच या कुंडाची किमंत असेल. यातील पाणी संपणार नाही, याची दक्षता आवर्जुन घेतात.



# कै. अमोल पिसेचे घवघवीत यश..!



आधुनिक केसरी न्यूज

**पिलीव :** माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कै.अमोल पिसे इंग्लिश मिडियम स्कूल या शाळेच्या मुलांचे घवघवीत यश राज्यस्तरीय घेण्यात येणाऱ्या मंथन स्पर्धा परीक्षेमध्ये दिसून आले. मंथन परिक्षेमध्ये यशस्वी झालेल्या मुलांना विविध पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पिलीव पंचक्रोशीतील प्रगतशील बागायतदार अमोल भैस यांनी विविध पारितोषिके देऊन मंथन मध्ये गुणवत्ता प्राप्त केलेल्या मुलांना प्रोत्साहित केले व मुलांचे मनोबल वाढवले.पिलीव केंद्रामध्ये प्रथम क्रमांक मिळवलेल्या आदित्य भारत लेंगरे या विद्यार्थाचा सत्कार करून त्याला सन्मानित करुन मार्गदर्शक शिक्षकांचे आभार मानले.प्रसंगी धांडोरे सर,कदम,काटे सर यांनी मार्गदर्शन केले.

# मजुराला ट्रॅक्टरला बांधून बेदम मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** एका गरीब मजुराला ट्रॅक्टरला बांधून तीन व्यक्ती त्याला बेदम मारहाण करीत असल्याचा 'व्हिडीओ' समाज माध्यमावर सार्वत्रिक झाला आहे. या घटनेचा समाज माध्यमावर चांगलाच संताप व्यक्त केला जात आहे. या घटनेबाबत पोलिसांमध्ये अद्याप तक्रार झालेली नाही. हा 'व्हिडीओ' ब्रम्हपुरी तालुक्यातील आहे. त्यामुळे पोलीस काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.आज सोमवारी समाजमाध्यमावर एका मजूर व्यक्तीला ट्रॅक्टरला बांधून तीन व्यक्ती हाताने, बेल्टने बेदम मारहाण करीत असतानाचा 'व्हिडीओ' सार्वत्रिक झाला. त्यामुळे एकच खळबळ उडाली. जो व्हिडीओ सार्वत्रिक झाला त्यामध्ये एका तरुण व्यक्तीला ट्रॅक्टरला बांधण्यात आले आहे. त्याला हाताने, बेल्टने मारहाण करीत आहेत. तसेच एका व्यक्तीच्या हातात कोयता असून त्याने मारण्याचा प्रयत्न आहे. तसेच हातात पेट्रोल अथवा डिझेलची छोटी कॅन दिसून येत आहे. त्या मजुरासोबत होणारा प्रकार भयावह आहे. या व्हिडीओ बाबत अधिक माहिती घेतली असता तो व्हिडीओ ब्रम्हपुरी तालुक्यातील बेलगाव (कापरी) येथील असल्याची माहिती समोर आली आहे. जे व्यक्ती मारहाण करीत आहेत, त्यामध्ये एक माजी जि.प. सदस्य, ग्रामपंचातय सदस्य असल्याची चर्चा आहे. याबाबबत अधिकृत माहिती नाही. ज्या व्यक्तीला मारहाण करण्यात येत आहे. तो व्यक्ती मजूर असून बीड जिल्ह्यातील आहे. पाणीपुरवठा योजनेचे काम करण्याकरिता या ठिकाणी आला असल्याची माहिती समोर आली आहे. एका मजुराला अमानुषपणे मारहाण करीत या घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला जात आहे. अद्याप या घटनेची तक्रार पोलिसात झालेली नाही. परंतु, सोशलमीडियावर 'व्हायरल' झालेल्या 'व्हिडीओ'च्या आधारे ब्रम्हपुरी पोलीस काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# तुमची आमची माय ग्रंथाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**वसमत :** रुख्मिणीबाई नारायणराव भालेराव या थोरमातेचे जीवन चरित्र असलेल्या "तुमची आमची माय " ग्रंथाचे प्रकाशन शनिवारी ( दि .१ ) वसमत तालुक्यातील कौडगाव शिवारातील बापूराव पाटील यांच्या शेतात वत्सलाबाई भोंग आणि सरसूबाई भोंग या लेकीच्या हस्ते झाले. कवी इंद्रजीत भालेराव यांनी आईच्या १०व्या स्मृतीदिनी कृतज्ञतापूर्वक या ग्रंथाची पहिली आवृत्ती लोकार्पण केली या प्रसंगी कवी इंद्रजित भालेराव,अरुण चव्हाळ ,कथाकार बबन आव्हाड,अमोल भालेराव,त्र्यबंक वडसकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. प्रस्तुत ग्रंथामध्ये कविता प्रतिक्रियेच्या माध्यमातून तीन पिढ्यांचा जीवन प्रवास व एका शेतकरी माहिलेने शेतीच्या माध्यमातून केलेला कर्तुत्ववान माणसांचा विकास या निमित्याने अधोरेखित झाला आहे ,महत्वाचे म्हणजे या ग्रंथातील वत्सलाबाई भोंग यांचा "खोंगा खोंगा साखर ' हा लेख मुंबई विध्यापीठाच्या आभ्यासक्रमात घेतल्यातच जमा आहे .अत्यंत परिणामकारक असलेला हा ग्रंथ "आदित्य प्रकाशन,छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आला आहे ,रिधोरा गावच्या चार भाऊ आणि चार बहिणी यांचा झालेला विस्तार आणि माईच्या अनुषंगानेआलेल्या कष्टाचा आणि मुल्यांचा आदर्श यांची सांगड या ग्रंथात दिसते व वाचायला मिळते महंत खेडकर बाबा, बा .भो .शास्त्री, वि.श.गौतम,श्रीकांत उमरीकर, केशव देशमुख, प्रकाश अंभोरे, प्रभाकर भालेराव, बालाजी काळे, गयाबाई भालेराव, हर्षवर्धन भालेराव,चंद्रगुप्त भालेराव यांच्यासह इतरांचेही लेख यामध्ये आलेले आहे. बहुतांश लेखन कवी इंद्रजित भालेराव यांनी केलेले असून त्यांचेच शब्दांकन आहे.

# बॅटरी चोरणारी चोरट्यांची टोळी जेरबंद

## सपोनि भरत मोरे यांची धडाकेबाज कारवाई चार चोरीच्या बॅटऱ्या जप्त

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील डाभा येथील काही दिवसांपूर्वी बॅटऱ्याचे चोरीचे प्रमाण जास्त वाढल्याने मा. पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया यांनी जिल्हयातील चोरी करणाऱ्या चोरट्यांचा शोध घेवून त्यांना जेरबंद करण्याबाबत सुचना सर्व सोयगाव, फर्दापूर सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत मोरे फर्दापूर अधिकारी यांना दिल्या आहेत.यावरुन सिल्लोड उपविभागिय पोलीस अधिकारी डॉ विजय मराठे साहेब यांनी अशा गुन्हयांचा जलद गतीने तपास करण्याबाबत मार्गदर्शन करुन गुन्हे उघडकिस आणुन अशा घटनांना आळा बसणे कामी मार्गदर्शन केले, यावरुन फर्दापुर पोलीस स्टेशनचे सपोनि भरत मोरे भरत मोरे फर्दापूर हे त्यांचे तपास पथकासह फर्दापुर शिवारातील नांदातांडा गांवामध्ये गु.र.नं. 41 / 2023 कलम 379 मध्ये फिर्यादी नामे प्रा.मदन मुरलीधर डोखळे रा.डाभा ता. सोयगांव यांचे टैक्ट्ररची बॅटरी चोरी झालेची फिर्यादवरून गुन्हा रजिस्टरी दाखल केला त्यांचा तपास मध्ये सपोनि भरत मोरे व त्यांचे पोलीस पथकास गोपणीय बातमी मिळाली की. नांदातांडा मधील एक इसम यांने सदरची चोरीची बॅटरी घेतल्यांची गोपणिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली त्याबाबतमीची त्यांनी तात्काळ खात्री केली असता आरोपी नामे किशोर मोरसिंग चव्हाण वय 28 वर्षे व्यवसाय शेती व मजुरी रा.नांदातांडा ता. सोयगांव यांने खरेदी करुन तो त्यांच्या स्वतः च्या टॅक्ट्ररमध्ये वापरत आहे असी माहिती मिळताच सपोनि भरत मोरे व त्यांचे पथकांने वरील इसमांस ताब्यात घेतले त्याने कबुल केले की, सदरची बॅटरी ही आदित्य तुकाराम राठोड रा. नांदातांडा यांनीच चोरी करुन त्याला विकलेली आहे त्यांना अटक करुन मा.न्यायालयाने 03 दिवसांची पोलीस कस्टडी दिली असल्याने सपोनि भरत मोरे व त्यांचे पथकांने धामणगांव बडे ता. मोताळा जि. बुलढाणा येथे जाऊन 02 आरोपी नामे तौफिक खान शवीर खान व फयाजिददीन मशरुददीन काझी दोन्ही रा. इंदीरानगर झोपडपटटी वार्ड नं. 04 धामणगांव बडे यांना ताब्यात घेतले तसेच घाणेगांव तांडा येथुन एक आरोपी नामे रणजित उर्फ ज्ञानेश्वर गोपीचंद चव्हान वय 32 वर्षे रा. घाणेगांव यास ताब्यात घेवुन वरील 05 आरोपी यांचे कडुन 40,000/- रुपये किंमतीच्या एकुन 04 चोरीला गेलेल्या बॅट-या जप्त करण्यात आलेल्या आहे वरील 05 आरोपीतांच्या टोळीला दिनांक 04/04/2023 रोजी पावेतो वाढीव पोलीस कस्टडी मिळाली असुन पोलीस अधिक तपास करीत आहेत.नमुद कार्यवाई ही सपोनि भरत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ मिरखाँ तडवी, पोना निलेश लोखंडे, पोकॉ. अंकुश भवर, पो. कॉ. प्रकाश कोळी, भरत कोळी, सतिश हिवाळे पोकी, पंकज व्यवहारे व फिरोज तडवी यांनी मिळून केलेली आहे. पुढील तपास फर्दापूर पोलिस स्टेशनचे पोलीस कर्मचारी करीत आहे.अशी माहिती सपोनि भरत मोरे फर्दापूर यांनी बोलताना सांगितले.

